cmyk

## संपादकीय

### जसे उपदेश देता तसे वागा सुद्धा !

लोकशाही सार्थ ठरवण्याची सगळ्यात मोठी जबाबदारी घटनेने जिच्यावर सोपवली ती जनता निवडणुकीनंतर कोणीही यावे आणि टपली मारून जावे असा अनुभव घेते. आता हेच पाहा ना, लोकांना उपदेश करण्याची चढाओढ नेत्यांमध्ये नेहमीच पाहायला मिळते. जाती आणि भाषेच्या मुद्यावरून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरु असतो. स्वतःला मागास म्हणणे हा राजकीय स्वार्थ आहे, असे नितीन गडकरी यांना वाटते.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com


### संविधानाला धोका मशिनमुळे नव्हे, अमानवीय निर्णयांमुळे!

तिराना: संविधानाला खरा धोका मशिनमुळे नव्हे, तर अमानवीय चुकांमुळे असल्याचे प्रतिपादन 'एआय' मंत्री डिएलाने संसदेतील भाषणावेळी केले. आपल्या पहिल्या भाषणात डिएलाने स्पष्ट केले की, विरोधक तिच्या नियुक्तीला सतत असंवैधानिक ठरवत आहेत आणि त्यांच्यावर आक्षेप घेत आहेत. मात्र, ती फक्त मनुष्याच्या मदतीसाठी आहे, मनुष्याची जागा घेण्यासाठी नाही. संविधानाला धोका मशीनमुळे नसून सत्तेत बसलेल्या लोकांच्या अमानवीय निर्णयांमुळे आहे, असे डिएलाने म्हटले. डिएलाने आश्वासन दिले की पारदर्शकता, जबाबदारी आणि निष्पक्षता या मूल्यांचे पालन ती तितक्याच काटेकोरपणे करेल जितके मनुष्य करतात.

बीड – महाराष्ट्र    वर्ष–५    अंक–१४५    शनिवार, दि.२० सप्टेंबर २०२५    RNI No.: MAHMAR/2021/85884    NO.L SB/BEED/RNP-206/2024-26    पाने–६    किंमत ३ रूपये

# इथेनॉलमुळे साखर कारखाने संकटात...!

## इथेनॉल मध्ये उसाचा वाटा फक्त २७ टक्के, ४० हजार कोटींना फटका बसण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**सरकारच्या इथेनॉल मिश्रण योजनेमुळे इंधन अवलंबित्व कमी झाले असून इथेनॉल उत्पादन वाढले आहे. तर ऊसावर आधारित इथेनॉलचा वाटा आता फक्त २७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. तर दुसऱ्या बाजुला मका आणि गव्हापासून इथेनॉल तयार करण्याचा वाटा बाजारपेठेत ७२ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे, ज्यामुळे ऊस उद्योगाला मोठा धक्का बसला आहे.**

सरकारने इथेनॉल मिश्रित पेट्रोल योजना सुरू केली, तेव्हा त्याचे उद्दिष्ट इंधन आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि इथेनॉलचे मिश्रण करून इंधन स्वस्त करणे हे होते. त्यावेळी, ही बातमी ऊस उद्योगासाठी एक महत्त्वपूर्ण चालना होती,



कारण त्यामुळे ऊस कारखान्यांना एक नवीन महसूल प्रवाह मिळाला. सुरुवातीला, बहुतेक इथेनॉल उत्पादन उसापासून होते, परंतु परिस्थिती बदलली आहे. २०१४ मध्ये, पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण फक्त १.५ टक्के होते, परंतु आता ते २० टक्क्यांपर्यंत वाढले आहे. जरी हे प्रमाण वाढले असले तरी, यापैकी बहुतेक इथेनॉल आता मका आणि गहू सारख्या पिकांपासून तयार केले जाते. दरम्यान, उसाचा वाटा फक्त २७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे, तर धान्य-आधारित इथेनॉलचा बाजारातील वाटा ७२ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. एका अहवालानुसार, २०२४-२५ मध्ये, धान्य-आधारित इथेनॉल उत्पादन ६.५ अब्ज लिटरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, तर ऊस-आधारित इथेनॉल उत्पादन फक्त २.५ अब्ज लिटरपर्यंत पोहोचेल. नुसार, यामुळे साखर कारखान्यांचे उत्पन्न कमी झाले आहे आणि त्यांच्यावर आर्थिक दबाव आला आहे. अहवालानुसार, गेल्या काही वर्षांत इथेनॉल उत्पादनासाठी ऊस उद्योगात लक्षणीय रक्कम गुंतवण्यात आली आहे. अहवालानुसार, २०१८ पासून ४० हजार कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे. उत्पादन क्षमता १४० टक्क्यांनी वाढली आहे. सर्वात मोठी समस्या अशी आहे की गेल्या तीन वर्षांपासून इथेनॉलचे दर स्थिर आहेत, तर उसाचे दर वाढत आहेत.

▶▶ पान २ वर

# अगोदर इंग्रजी शिक मग दिल्ली नव्हे,अमेरिकात जावं

## केज मधील ओबोसी मेळाव्यात प्रा.लक्ष्मण हाकेंचं जरांगेंना आव्हान

केज । प्रतिनिधी

मराठा आरक्षण प्रश्नी मनोज जरांगे यांनी आता दगाफटका झाला तर आता थेट दिल्लीत जाऊ असा इशारा दिला होता यावर ओबीसी एल्गार सभेत बोलताना अगोदर इंग्रजीत रिजर्वेशन चे स्पेलींग काढून दाखव त्यासाठी इंग्रजी शिकावी आणि मग दिल्ली काय अमेरिकेत जावं असा इशारा मनोज जोराने याना



ओबोसी नेते प्रा लक्ष्मण हाके यांनी दिला या मेळाव्याला तालुक्यातून मोठ्याप्रमाणात ओबोशी बांधव सहभागी झाले होते.

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या आज बीडच्या केज आणि गेवराई दोन ठिकाणी महाएल्गार सभा होत आहेत. दरम्यान लक्ष्मण हाके यांनी जरांगे पाटील यांच्यावर कडाडून टीका केली. मनोज जरांगे पाटील यांनी ज्या भूमीतून ओबीसींचे आरक्षण संपविले. त्याच भूमीत महाएल्गार सभा होत आहेत. तर खासदार बजरंग सोनवणे यांच्या डोक्यावर परिणाम झाला त्यामुळे त्यांच्या पायाखालची वाळू सरकल्याचं हाके


▶▶ पान २ वर

# जिल्हा परिषद सर्कल आरक्षण रोटेशन नाहीच

नागपूर । प्रतिनिधी

**ग्राम विकास विभागाने आगामी निवडणुकीपासून जिल्हा परिषद सर्कल आरक्षणासाठी नवीन रोटेशन राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात २० ऑगस्ट रोजी अधिसूचना काढण्यात आली आहे. या अधिसूचनेला आव्हान देणाऱ्या चार याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवार दि. १९ सप्टेंबर रोजी फेटाळून लावल्या व सरकारचा निर्णय अवैध नसल्याचे स्पष्ट केले.**

न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांनी हा निर्णय दिला. नागपूर, अमरावती आणि बुलडाणा जिल्ह्यातील राजकीय कार्यकर्त्यांनी या



याचिका दाखल केल्या होत्या. सर्कल आरक्षणाचे जुने रोटेशन पूर्ण झाल्याशिवाय नवीन रोटेशन सुरू करता येत नाही. सरकारचा निर्णय अवैध, निराधार, मनमानी तसेच एकतर्फी आहे असा आरोप याचिकाकर्त्यांनी

▶▶ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा पवित्रा

मुंबई । प्रतिनिधी

ऐन दिवाळीच्या मुहूर्तावर आपल्या मागण्यांसाठी एसटी प्रवाशांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न गोपीचंद पडळकर-सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखालील संघटनेकडून केला जाण्याची शक्यता आहे. एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा येत्या २८ सप्टेंबरपासून आंदोलन करू असा इशारा सेवा शक्ती संघर्ष एस.टी. कर्मचारी संघटनेने दिला आहे. मुंबईतील मध्यवर्ती कार्यालयासमोर आत्मक्लेश आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.महाराष्ट्र राज्य मार्ग

▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणीच्या प्रचार प्रसारावर चार कोटीचा खर्च



छ.संभाजीनगर-बीड । प्रतिनिधी

निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने मोठा गाजावाजा करत राज्यात लाडकी बहीण योजना सुरू केली आणि त्याचा फायदाही झाला राज्यातील प्रत्येक लाडक्या बहिणीला पंधराशे रुपये प्रतिमा या योजनेचा प्रचार आणि प्रसिद्धी करण्यासाठी राज्य सरकारने जवळपास चार कोटी ९२ लाख रुपयांचा खर्च

▶▶ पान २ वर

### प्रचार प्रसिद्धी वरील खर्च

साहित्य खरेदी -३८ लाख २५ हजार, दूरदर्शन -सात दिवस दहा लाख रुपये, आकाशवाणी केंद्र -२५ लाख रुपये, मराठी वृत्तवाहिनी- एक कोटी रुपये, एफएम वाहिन्या - ७० लाख रुपये, सोशल मीडिया - ५० लाख रुपये, एसटी बस स्थानक- ६० लाख रुपये बस स्थानक एलईडी - ६० लाख रुपये, बेस्ट बस - साठ लाख रुपये, प्रशासकीय खर्च- १८ लाख ९३ हजार

# कौशल्य विकासामुळेच देशाचा विकास शक्य

मुंबई । प्रतिनिधी

कौशल्य विकास ही देशाच्या प्रगतीची किल्ली आहे. कौशल्य विकास मध्ये फक्त केवळ योजनांची आखणी नव्हे तर राष्ट्रीय व आंतरराज्य कौशल्य विकासातील यशोगाथा प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सुसंवाद, समन्वय आणि एकात्मता असणे ही काळाची गरज आहे. राज्य व केंद्र सरकारमध्ये राज्यांनी आपापसात अधिक सुसंवाद ठेवून 'टीम इंडिया' म्हणून कार्य करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ च्या स्वप्नाला साकार करूया, असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे केंद्रीय कौशल्य विकास विभाग व राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागातर्फे क्षमता वृद्धी व जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या

▶▶ पान २ वर

# पुन्हा चौथी व सातवीसाठी शिष्यवृत्ती परीक्षा होणार

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद व महानगरपालिकांना अनुक्रमे प्रथम क्रमांकास ५ कोटी, द्वितीय क्रमांकास ३ कोटी आणि तृतीय क्रमांकास २ कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

बालेवाडी येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचे उद्घाटन त्यांच्या

▶▶ पान २ वर

# आगामी निवडणुकांत सर्वत्र आघाडी अशक्य- शरद पवार

कोल्हापूर । प्रतिनिधी

ज्या पद्धतीने लोकसभा व विधानसभेला महाविकास आघाडी म्हणून एकत्र लढलो तसे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सगळीकडेच एकत्र लढणे शक्य नाही, प्रत्येकाची बलस्थाने पाहून त्या त्या वेळी निर्णय घ्यावे लागतील, अशी स्पष्ट भूमिका



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी कोल्हापुरात पत्रकार परिषदेत मांडली.

शरद पवार म्हणाले, सर्वच पक्षांची विविध ठिकाणी बलस्थाने आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सगळीकडेच एकत्र येणे अशक्य आहे. याचे निर्णय त्या त्या वेळी घेतले जातील. मुंबईत उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येत असतील तर ते

▶▶ पान २ वर

# अडाणी यांचे संदर्भातील व्हिडीओ सोशल मीडियावरून हटविण्याचे सरकारचे निर्देश

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भारतातील उद्योगपती गौतम अदानी यांच्या अनेक आक्षेपार्य व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले होते या संदर्भात सरकारने सोशल मीडियावरील आदानी यांच्या वर आक्षेपारे करण्यात आलेल्या पोस्ट हटवण्याचे निर्देश दिले आहेत.**

सोशल मीडियाच्या माध्यमातून काही पत्रकार आपली भूमिका मांडत आहेत



मात्र सरकार विरोधी भूमिका मांडली गेली की त्यावर बंधने घातली जात आहेत यातलाच हा एक भाग असून उद्योगपती गौतम अडाणी यांचे युट्युब इंस्टाग्राम आधी सोशल मीडियावर असलेले व्हिडिओ पोस्ट डिलीट करण्याचे निर्देश दिले आहेत डिलीट न केल्यास आम्ही युट्युब ला सांगून ते डिलीट करू असे सरकारने नमूद केले आहे मराठी पत्रकार परिषदेचे

▶▶ पान २ वर

### सरकारकडून माध्यमाची मुस्कटदाबी एसएम देशमुख

दिल्लीमधील न्यायालयाने अडाणी यांच्या विरोधात पोस्ट शेअर करणाऱ्यांना त्या पोस्ट हटवण्याच्या सूचना दिल्यानंतर न्यायालयाने आदेश देतात केंद्रीय माहिती आणि प्रसारक मंत्रालय सक्रिय झाले असून रविष कुमार अजित अंजुम पर जॉय गुहा आकाश बॅनर्जी यांच्या प्लॅटफॉर्मवरून १३८ यूट्यूब व्हिडिओ आणि ८३ पोस्ट डिलीट करण्याचे फर्मान सरकारने सोडले आहे ही पत्रकार स्वातंत्र्यावर गदा असल्याचे मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस एम देशमुख यांनी म्हटले आहे.

# ४४५ महाविद्यालयाना बजवाल्या नोटिसा

पुणे । प्रतिनिधी

शैक्षणिक संकुलातील दर्शनी भागात, वेबसाइटवर अभ्यासक्रमांचे शुल्क प्रसिद्ध न करणाऱ्या राज्यातील ४४५ व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) नोटिसा पाठवल्या आहेत. शुल्काबाबत एफआरएच्या नियमावलीचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांवर आगामी काळात सक्त कारवाई करून त्यांची नावे प्रसिद्ध करण्यात येईल, असेही सूतोवाच 'एफआरए'ने केले आहे.

राज्यातील मेडिकल, इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी, लॉ अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्क ठरवण्याची जबाबदारी 'एफआरए' वर आहे. 'एफआरए'च्या महाराष्ट्र विनाअनुदानित

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### अल्बानियात जगातील पहिली एआय मंत्री

नवीदिल्ली : जगभरात एआयचा बोलबाला सुरू असताना त्यातून आता राजकारण आणि धोरणकर्तेही सुटणार नाहीत. जगात प्रथमच एखाद्या देशाने कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री नेमण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. अल्बानियामध्ये एआय मंत्री म्हणून नियुक्त झालेल्या डिएला हिने नुकतेच संसदेतील आपले पहिला भाषण दिले. या घटनेने संपूर्ण जगाचे लक्ष अल्बानियाकडे वेधले आहे. आपल्या पहिल्या भाषणात डिएलाने स्पष्ट केले की, विरोधक तिच्या नियुक्तीला सतत असंवैधानिक ठरवत आहेत आणि त्यांच्यावर आक्षेप घेत आहेत. मात्र, ती फक्त मनुष्याच्या मदतीसाठी आहे, मनुष्याची जागा घेण्यासाठी नाही. संविधानाला धोका मशीनमुळे नसून सत्तेत बसलेल्या लोकांच्या अमानवीय निर्णयांमुळे आहे, असे डिएलाने म्हटलं.

### देवेंद्र फडणवीसांनी पाडळकरचे टोचले कान

सांगली : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी जत विधानसभा मतदारसंघात बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्याविरोधात वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांमुळे राजकीय वाद निर्माण झाला आहे. पडळकरांच्या वक्तव्यावरून शरद पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट फोन करून नाराजी नोंदवली. त्यानंतर फडणवीस यांनी प्रतिक्रिया देताना स्पष्ट केलं की, ''गोपीचंद पडळकरांनी केलेलं विधान योग्य नाही. कोणाच्याही वडिलांबाबत किंवा कुटुंबाबद्दल टिप्पणी करणे योग्य ठरत नाही. मी स्वतः त्यांच्याशी बोललो असून त्यांना हे सांगितलं आहे.''तसेच''शरद पवारांचा मला फोन आला होता.असे सांगताना मी पडळकरांना बोलले असल्याचे म्हणले .

### चार सख्ख्या बहिणींवर लैंगिक अत्याचार

अहिल्यानगर : राहुरी तालुक्यात माणुसकीला काळीमा फासणारी संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका नराधमाने एकाच कुटुंबातील चार बहिणींवर लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा आरोपी चारही बहिणींचे शारीरिक शोषण करत होता. धक्कादायक म्हणजे, हा नराधम त्यांचा लांबचा नातेवाईक असल्याचे तपासातून उघड झाले आहे.या प्रकरणी पोलिसांनी आरोपीसह त्याच्या पत्नीलादेखील अटक केली असून घटनेचा पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आई-वडील विभक्त झाल्याने एका कुटुंबातील चार बहिणींचा सांभाळ करण्याची जबाबदारी दूरच्या नातेवाईकाकडे सोपवण्यात आली होती.

### बिहारमध्ये शिंदे पॅटर्न' रिपीट करण्याची तयारी

नवी दिल्ली: बिहार विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याआधी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शहा यांनी बैठकांचा सपाटा लावला आहे. संघटना पातळीवर बैठका घेत त्यांनी निवडणूक प्लान ऍक्टिव्ह केला आहे. १८ सप्टेंबरला त्यांनी डेहरी ऑन सोन आणि बेगुसरायमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये शहांनी ६० दिवसांची योजना सांगितली. दोन तृतीयांश जागा जिंकण्याचं ध्येय भाजपनं ठेवलं आहे.ज्या पद्धतीने महाराष्ट्रात संख्याबळ अधिक असताना भाजपाने एकनाथ शिंदे याना मुख्यमंत्री केले होते अगदी त्याच पद्धतीने बिहारमध्ये भाजपने रणनीती सुरु केली आहे .

### बॅलेट पेपरवरच निवडणूक घ्या-काँग्रेस

पुणे : राज्यात अनेक ठिकाणचे मतदान यंत्र नादुरुस्त असून एकट्या पुणे विभागात तब्बल साडेचार हजार मतदान यंत्रे नादुरुस्त असल्याचे प्रशासकीय यंत्रणांकडून सांगितले जात आहे. एकीकडे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी देशभरातील मतचोरी उघडकीस आणत आहेत, तर दुसरीकडे आयोग नादुरुस्त यंत्रांवर मतदान घेण्याचे जाहीर करत आहे. त्यापेक्षा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मतचिठ्ठीद्वारेच घ्याव्यात, अशी मागणी काँग्रेसने केली आहे. आयोगाकडूनच मतदान यंत्रांच्या नादुरुस्तीचा मुद्दा पुढे केला जात आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत व्हीव्हीपॅट देता येणार नाही.

### अदानीला क्लीन चीट

नवी दिल्ली : आशियामधील सर्वात श्रीमंत उद्योजक आणि भारतातील दिग्गज उद्योगपती गौतम अदानी यांना हिंडेनबर्ग प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. सेबीने या प्रकरणात आपली चौकशी पूर्ण केली आहे. या प्रकरणात अदानी समूहाला क्लीन चीट देण्यात आली आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१९ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ३८.०० क्विंटल | २,२०१ | २,९५१ | २,६३६ |
| ज्वारी/हायब्रिड : २१.०० क्विंटल | २,१०१ | २,८७० | २,४६५ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.५० क्विंटल | ५,३०० | ५,३०० | ५,३०० |
| उडीद : ९४.०० क्विंटल | ३,४०१ | ५,७९१ | ५,०२९ |
| बाजरी: ३५.०० क्विंटल | २,२०० | २,८५० | २,५९९ |
| मुग:२१.५० क्विंटल | ४,४५० | ७,००० | ५,८६२ |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ३,६९९ | ४,१२५ | ३,८४३ |
| हरभरा: ४.५० क्विंटल | ४,५०० | ५,२८१ | ४,९१६ |

cmyk

अग्रलेख

# जसे उपदेश देता तसे वागा सुद्धा !

लोकशाही सार्थ ठरवण्याची सगळ्यात मोठी जबाबदारी घटनेने जिच्यावर सोपवली ती जनता निवडणुकीनंतर कोणीही यावे आणि टपली मारून जावे असा अनुभव घेते. आता हेच पाहा ना, लोकांना उपदेश करण्याची चढाओढ नेत्यांमध्ये नेहमीच पाहायला मिळते. जाती आणि भाषेच्या मुद्यावरून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू असतो. स्वतःला मागास म्हणणे हा राजकीय स्वार्थ आहे, असे नितीन गडकरी यांना वाटते. जग कुठे चालले, तुमचे काय चालले, आत्मचिंतन करा आणि सुधारा स्वतःला, असे अजित पवार यांनी बीडच्या कार्यक्रमात कार्यकर्त्यांना नुकतेच सुनावले.

कार्यकर्ते म्हणजे जनताच. सामाजिक वीण दुबळी होता कामा नये, असे शरद पवार यांना वाटते. समाजात सामंजस्य आणि एकता निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी सर्वांना एकत्र यावे लागेल, असेही ते सुचवतात. एरवी राजकीय नेत्यांमध्ये एखाद्या मुद्यावरून एकमत आढळणे अवघडच. उपदेशांच्या मुद्यावर मात्र ते आढळते. उपदेश चांगलाच असतो फक्त 'शिवाजीराजे शेजारच्या घरात जन्माला यावेत' अशा थाटाचा तो असतो. तो उपदेश जनतेने अमलात आणावा अशी त्यांची अपेक्षा असते. पण त्या बदलाची सुरुवात ते करू शकतात याचा मात्र नेत्यांना सोयीस्कर विसर पडतो.

सामाजिक वीण उसवत चालली आहे हे खरे. पण ती लोकांनी उसवली का? समाज भेदाभेदाच्या उंबरठ्यावर उभा असल्याची भीती नेहमीच व्यक्त केली जाते. पण तशी परिस्थिती कोणी निर्माण केली यावर सर्वपक्षीय चुप्पी आढळते. सगळ्या मुद्यांवरून राजकारण केले जाते. नेते कोणताही मुद्दा सोडत नाहीत. अगदी राष्ट्रभक्तीचासुद्धा. राजकीय पक्ष जातीपातीचे राजकारण करतात. एरवी जातीभेद करू नका असे सगळेच म्हणतात. पण निवडणूक जाहीर झाली की खायचे दात लोकांना दिसतात. निवडणूक तिकीटवाटपाचा जात हा प्रमुख निकष मानला जातो, हे कोणीही नाकारू शकणार नाही.

जात आणि आर्थिक बळ बघूनच तिकीटवाटप सगळेच पक्ष करतात हे उघड सत्य आहे. तो निकष पूर्ण करणाऱ्या व्यक्तीवर कितीही गंभीर गुन्हे दाखल झालेले असले तरी पक्षांना त्याचा फरक पडत नाही. निवडून आला की त्याला पावन करून घेतले जाते. त्याअर्थाने सगळेच पक्ष धुलाई यंत्र नव्हेत का? एरवी बहुभाषिकत्व हा व्यक्तीचा विशेष गुण मानला जातो. संधी मिळेल तेव्हा त्याचा अभिमानाने उल्लेख केला जातो. तरीही भाषांवरून वाद निर्माण होतातच. ते लोक निर्माण करतात का? वेळोवेळी उपस्थित केल्या जाणाऱ्या मुद्यांची राजकीय पार्श्वभूमी एकवेळ बाजूला ठेवली तरी किती पक्ष ते मुद्दे परिणामकारकपणे धसास लावताना आढळतात?

लोकांना भरीस घालून राजकीय स्वार्थ साधण्यासाठीच मुद्यांचा वापर सगळेच करतात. मग तो मुद्दा टोलचा, रस्त्यांचा, धरणातील पाण्याचा, प्रदूषित नद्यांचा, आरक्षणाचा, अभावग्रस्त गावांचा असा कोणताही असू शकतो. परिस्थितीवरून मुद्दे ठरतात, बाकी जनतेचे तारणहार असल्याचा आवेश मात्र दरवेळी तोच आढळतो. असा हा सगळा दुसऱ्याच्या काठीने साप मारण्याचा उद्योग सर्वच पक्ष वेळोवेळी आरंभतात आणि सुधारण्याचा उपदेश मात्र लोकांना केला जातो. सामाजिक वीण आणि वास्तवातील जनकल्याण या मुद्यावरून सुधारण्याची खरी गरज नेते आणि त्यांच्या पक्षांना आहे.

पण उपदेश करायला मूल्य लागत नाही. करणाऱ्यावर तो अंमलात आणणे घटनेनेही बंधनकारक केलेले नाही. 'आधी केले मग सांगितले' हे कसब अंगी बाणवायची गरज कोणालाही भासत नाही. राज्यातील संत आणि समाजसुधारक हा उपदेश शब्दशः जगले. पण राजकीय स्वार्थाने त्यांनादेखील जातीपातीत वाटून टाकण्याचे पाप आढळते. तेव्हा एकतरी उपदेश नेत्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणण्याची गरज आहे. त्यांनी तसा आदर्श घालून दिला तर कार्यकर्तेदेखील त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवतील. पण वास्तव मात्र वेगळे आहे. त्यामुळे जे वरती तेच खाली पाझरते अशी अवस्था आहे. त्यामुळे उपदेश या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देण्यासाठीच असतात हा भ्रम मात्र बळावत चालला आहे.

# उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांच्या मध्यस्थीने रेल रोको आंदोलन मागे

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**



पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी, अंमळनेर,कोतन तसेच पांगरीसह अनेक शेतकऱ्यांच्या बीड- अहिल्यानगर रेल्वे मार्गात जमिनी गेल्या असून त्या जमिनीचा मावेजा प्रलंबित असल्याने तो मावेजा मिळावा म्हणून येथील शेतकऱ्यांनी दि.१७/०९/२०२५ मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी अंमळनेर रेल्वे स्टेशनवर ''रेल रोको'' आंदोलन करण्याचा संबंधित विभागांना इशारा दिला होता. ''रेल रोको'' आंदोलन करण्यासाठी अनेक शेतकरी अंमळनेर येथील रेल्वे स्टेशनवर येऊन थांबले होते.या ठिकाणी सकाळी १० वा.वसिमा शेख (उपविभागीय अधिकारी पाटोदा- आष्टी) व दत्तात्रय निलावाड (तहसीलदार पाटोदा),बाबर शेख (सहाय्यक महसूल अधिकारी),सुनिल तांबारे मंडळ अधिकारी अंमळनेर, तलाठी श्रीमती सिता नेमाने,दिपाली लांडगे,बाळू बडे,अमोल मस्के यांनी येऊन आंदोलन करत्या शेतकऱ्यांची भेट घेतली व सविस्तर चर्चा करून शेतकऱ्यांच्या समस्या सविस्तर ऐकून घेतल्यावर त्या सर्व समस्या मार्गी लावल्या जातील असे आश्वासन दिले. व शेतकऱ्यांनी ''रेल रोको'' आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती केली.तसेच मावेजा बाबत ज्या त्या शेतकऱ्यांनी लेखी अर्जाद्वारे सविस्तर माहिती देऊन सर्व शेतकऱ्यांनी स्वतः दिनांक १९/०९/२०२५ शुक्रवार रोजी पाटोदा येथील उपविभागीय कार्यालयात उपस्थित राहावे.त्यावेळी सविस्तर चर्चा करून संबंधित मावेजा विषयी ज्या त्या विभागाला माहिती कळवून मावेजा समस्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील राहील असेही त्या यावेळी म्हणाल्या.शुक्रवार दि.१९/०९/२०२५ रोजी संबंधित शेतकऱ्यांनी पाटोदा येथील उपविभागीय कार्यालयात जाऊन उपविभागीय अधिकारी वसिमा शेख यांची भेट घेवून,मावेजा संबंधी लेखी अर्ज देऊन मावेजा समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याची विनंती केली.वसिमा शेख उपविभागीय अधिकारी पाटोदा, दत्तात्रय निलावाड तहसीलदार पाटोदा यांच्या आश्वासनामुळे संबंधित शेतकऱ्यांनी ''रेल रोको'' आंदोलन मागे घेऊन शेतकऱ्यांनी सामंजस्याची भूमिका घेतली.

# शिक्षकाच्या बदलीनंतर विद्यार्थी डसडसा रडले शिक्षकाच्याही डोळे आले भरून

**धारूर । प्रतिनिधी**

**शहरालगत असणाऱ्या वडरवाडा झोपडपट्टी भागात मोलमजुरी करून जगणारी कुटुंब जास्त आहेत अशा कुटुंबातील पाल्यांसाठी येथे जि प. ची शाळा आहे येथील मुख्याध्यापक एस एस शेख यांची येथून बदली झाल्यावर अक्षरशः त्यांना निरोप देताना मुलांच्या डोळ्यातून पाणी वाहत होते व या मुलांचे प्रेम जिव्हाळा पाहून या शिक्षकाचे डोळेही डबडबून आले व विद्यार्थी शिक्षक प्रेमाचे नाते किती घट्ट आहे हे दाखवण्याचे काम केले.**



धारूर शहरालगत असणाऱ्या वडर वाडा झोपडपट्टी या भागात जीपची पहिली ते पाचवी पर्यंतची शाळा आहे या ठिकाणी मोल मजुरी करून उदरनिर्वाह भागवणाऱ्या कुटुंबातील मुले ही मोठ्या संख्येने शिक्षण घेणारी आहेत या शाळेत मुख्याध्यापक म्हणुण शेख एस एस हे सात ते आठ वर्षापासून काम पाहतात त्यांचा विद्यार्थ्यांची जिव्हाळा व प्रेम हा सातत्याने होता ते त्यांच्या वैयक्तिक आरोग्य समस्येने हैराण असले तरी त्यांनी विद्यार्थ्यांशी आपले नाते कधीही तुटू दिले नाही व सातत्याने शाळेत ते उपस्थित असत त्यांचे व विद्यार्थ्यांचे गुरु शिष्याचे वेगळे असे नाते जोडले होते त्यांची येथून शासकीय नियमानुसार धारूर शहरातील केंद्रीय प्राथमिक शाळेत बदली झाल्यानंतर त्यांना निरोप देताना या शाळेतील विद्यार्थ्यांचे डोळे अक्षरशः डबडबून आले होते व सर्वच विद्यार्थी डसडसा रडत होते व या विद्यार्थ्यांचे प्रेम पाहून शेख एस एस यांचेही डोळे पाणावले ही परिस्थिती पाहून गुरु व शिष्याचे नाते कसे दृढ असावे हे दाखवण्याचे काम या घटनेतून दिसून आले व असेच काम इतरही सर्व शिक्षकांनी आदर्श घेऊन करावे अशा प्रतिक्रिया पालक वर्गातून व्यक्त केल्या जात होत्या मात्र शेख एस एस यांच्या कार्य पाहून निश्चितच आदर्श कार्य शैक्षणिक क्षेत्रात प्रत्येकाने करावे असे त्यांचे कार्य आहे हे मात्र या निरोपाच्या प्रसंगी दिसून आले यावेळी शाळेतील सर्व शिक्षकही उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### ओबीसी नेत्या

गरज आहे.''समाजातील तरुणांनी शिक्षण, नोकरी, उद्योग-व्यवसाय अशा सर्वच क्षेत्रात पुढाकार घ्यावा आणि ओबीसी आरक्षणाबाबत शासन दरबारी आवाज बुलंद करावा, असे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी उपस्थित ओबीसी बांधवांनी डॉ. सोनकाटे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. बीड जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या समाजातील कार्यकर्त्यांनी त्यांच्या नेतृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. संवाद कार्यक्रमास ओबीसी समाजातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

### वैष्णोदेवी मंदिरात महादेव

नित्यनियमाप्रमाणे दररोज सकाळी ७ वाजता व संध्याकाळी ७ वाजता महाआरती व रात्री ९ वाजता शयन आरती चे आयोजन होत असते यावेळी भक्तजनांनी आरती चा लाभ घ्यावा असे आवाहन मंदिर संस्थान तर्फे संस्थानचे अध्यक्ष श्री संतोष सोहनी, कोषाध्यक्ष श्री संजय सोहनी, विश्वस्त शिवप्रसाद दायमा, गोविंद तोष्णीवाल, पवन शर्मा, मोहित कासट इ. यांनी केले आहे.

-------------

### खड्ड्यांनी गिळला

रूपांतर खड्ड्यांच्या महामार्गात झाले आहे. गाडी वेळेत पोहोचू शकली नाही आणि मुलीचा जीव गेला. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे खड्ड्यांमुळे केवळ अपघातच नाही, तर उपचाराअभावी जीव गमावण्याची वेळ सामान्य जनतेवर येते आहे. ग्रामस्थांचे डोळे अश्रूंनी भरले होते.आईवडिलांच्या डोळ्यांसमोर त्यांच्या लेकराला रस्त्याच्या खड्ड्यांनी हिरावून घेतलं. रुग्ण नाही, तर जणू रस्त्यावरील निष्काळजीपणाने आणि लोकप्रतिनिधींच्या बेफिकिरीने हा जीव गेला अशी भावना लोकांतून व्यक्त होत आहे.या घटनेनंतर स्थानिकांमध्ये संताप उसळला आहे.''रस्ता नाही, म्हणजे आमचे आयुष्य नाही'' अशा शब्दांत ग्रामस्थांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. आता तरी लोकप्रतिनिधींनी जागे होऊन या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करावे अशी जोरदार मागणी होत आहे.

-------------

### पीक विमा कंपनीच्या

केंद्र व राज्य सरकारकडे याबाबत तातडीने लक्ष देण्याची मागणी केली असून, पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या फक्त नियम पाळून नव्हे तर तात्काळ आणि प्रभावी पद्धतीने पंचनाम्याची कार्यवाही करावी, असे आवाहन केले आहे. या स्थितीत विलंब केल्यास पीक विमा कंपनी अधिकाऱ्यांना चांगलाच धडा शिकवू असा इशारा थावरे यांनी दिला आहे.

-------------

### एस.पी. नवनीत काँवत यांनी

प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. शिस्तप्रिय, कार्यतत्पर, सजग आणि मृदू प्रसंगी कठोर आणि 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीद वाक्याशी निष्ठा असलेला अधिकारी अशी त्यांची प्रतिमा निर्माण होत आहे. कायदा, सुव्यवस्था, शांतता राखण्यासाठीची उपाययोजना, आदी विविध कामाबरोबरच पोलिस, कर्मचारी- अधिकारी यांच्यासाठी स्वतः पोलिस अधीक्षक कुटुंब प्रमुख म्हणून बारकाईने आणि गांभीर्यपूर्वक पाहत असल्याचे यावरून दिसून आले आहे.

-------------

### ना. छगन भुजबळ यांच्या

आत्महत्या सारखे शेवटचे पाऊल उचलू लागले आहेत. यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यास ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्यासह ओबीसी समाजातील राज्यातील आणि राज्याबाहेरील नेते मार्गदर्शन करणार असल्याची माहिती अॅड. सुभाष राऊत यांनी दिली आहे.

-------------

### श्री योगेश्वरी मल्टिस्टेट

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे यांनी मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर केले. प्रारंभी त्यांनी उपस्थित सर्व ग्राहक तसेच ठेवीदार, सभासद यांच्यासह संस्थापक राजकिशोर मोदी यांचे स्वागत केले. संस्थापक राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांसठी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट ची स्थापना केली. या संस्थेद्वारे हजारो तरुण बेरोजगार , व्यापारी तसेच शेतकऱ्यांना त्यांना त्यांच्या अडचणीच्या काळात आर्थिक सहकार्य केले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे यांनी याप्रसंगी नमूद केले. त्यानंतर वार्षिक सभेपुढे ऐनवेळी येणाऱ्या विविध विषयांवर चर्चा होऊन त्यास मंजूरी घेण्यात आली.

--------

## पान १ वरून...

### इथेनॉलमुळे साखर

आज साखर कारखान्यांना शेतकऱ्यांना उसासाठी जास्त पैसे द्यावे लागत आहेत. परंतु इथेनॉल आणि साखरेच्या किंमती त्याच पातळीवर आहेत. याचा अर्थ असा की कच्च्या मालाच्या किमती वाढल्या आहेत, परंतु त्यापासून बनवलेल्या उत्पादनांच्या किमती जवळजवळ अपरिवर्तित राहिल्या आहेत. जर ही परिस्थिती बदलली नाही, तर ही गुंतवणूक वाया जाऊ शकते. इस्माच्या अधिकाऱ्यंनी दिलेल्या माहितीनुसार, जर कच्च्या मालाच्या किंमती वाढल्या आणि तयार उत्पादनांच्या किमती वाढल्या नाहीत तर साखर कारखाने कसे चालतील? सरकारने अलीकडेच उसाचा रस, सिरप आणि मोलॅसिसपासून इथेनॉल उत्पादनास परवानगी दिली आहे. परंतु किंमती वाढवल्या नाहीत. यामुळे कारखान्यांच्या नफ्यावर दबाव वाढत आहे. बहुतेक लहान साखर कारखाने कर्जाच्या प्रचंड ओझ्याखाली दबले जात आहेत. मोठ्या कंपन्यांना वीज निर्मिती आणि इतर व्यवसायांकडून काही प्रमाणात पाठिंबा मिळत असला तरी, लहान साखर कारखाने त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठीही संघर्ष करत आहेत. या गिरण्यांना कर्ज देणाऱ्या बँका देखील या परिस्थितीबद्दल चिंतेत आहेत. जर इथेनॉलच्या किमती वाढल्या नाहीत तर ही कर्जे अनुत्पादक मालमत्ता (एनपीए) बनू शकतात. म्हणजेच, जर गिरण्या पैसे कमवू शकत नसतील तर ते बँकांचे कर्ज कसे फेडतील? शिवाय, जर उसापासून इथेनॉलचे उत्पादन वाजवी किमतीत वाढले नाही तर साखरेचा साठा वाढेल आणि किमती घसरतील, ज्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे पैसे न मिळण्याची शक्यता निर्माण होईल.

-------------

### जिल्हा परिषद सर्कल

केला होता. दुसरीकडे सरकारने निर्णयाचे समर्थन केले होते. याचिकाकर्त्यांची मागणी मंजूर केल्यास निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप होईल. कायद्यानुसार निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण केला जाऊ शकत नाही. तसेच, ६ मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणूका चार महिन्यांत घेण्याचा आदेश दिला आहे असे सांगितले होते. याचिकाकर्त्यांतर्फे वरिष्ठ अॅड. रवींद्र खापरे व अॅड. महेश धात्रक तर, सरकारतर्फे महाधिवक्ता वरिष्ठ अॅड. बिरेंद्र सराफ यांनी बाजू मांडली.

-----------

### अगोदर इंग्रजी शिक मग

यांनी म्हटलं आहे. छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या मराठा समाजाच्या गोलमेज परिषदेच्या माध्यमातून ओबीसींच्या मनात भ्रम निर्माण करून गाफील ठेवण्याचा प्रयत्न असून तुम्हाला काय भांडायचे ते भांडा आम्हाला अंडरस्टिमेट करू नका असं हाके म्हणत आहेत. जरांगे पाटील यांनी दिल्ली नाही तर अमेरिका अथवा आफ्रिकन कंट्रीमध्ये जावं. तिथे जाऊन आरक्षणाचं ज्ञान पाजळावं. तसेच जरांगे पाटील यांनी इंग्रजी शिकून रिझर्वेशनच स्पेलिंग शिकावं असं चॅलेंज हाके यांनी दिले. इथल्या लोकांनी कारखानदारांनी जरांगे पाटील यांना गुळाचा गणपती केला. दिल्लीत जाऊन तुमची अगरबत्ती कुठे लावणार? असा सवाल हाके यांनी उपस्थित केला. माझ्यासाठी अकराशे जणांची टीम तयार करा. त्यांना मी प्रत्युत्तर देण्यासाठी तयार आहे. अकरा जणांची टीम केली तरी लक्ष्मण हाके घरी बसणार नाही. तर मराठा समाजापुढे ठेवलेल्या लग्नाच्या प्रस्तावावरून हाके यांनी यू टर्न घेत मी तसे काही बोललो नाही असंही त्यांनी म्हटलं आहे. आम्ही टीट फॉर टॅटची भाषा बोलत आहोत. दोन वर्ष संविधानाची भाषा बोललो आता मात्र आमचा विद्रोह आहे. तर दसऱ्यानंतर मुंबईला जाणार असल्याचं हाके यांनी सांगितले आहे.

**नवनाथ वाघमारेंची सुरेस धसांवर टीका**

यांना जर आमचा ग्रामपंचायत सदस्यही चालत नसेल तर आम्हालाही यांचा आमदार चालणार नाही, यापुढे ओबीसींनी ओबीसींनाच मतदान करायचं असं वक्तव्य ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी केलं. आष्टीचा जब्या म्हणत त्यांनी भाजप आमदार सुरेस धसांवरही टीका केली. आष्टीचा जब्या विधानसभेला पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडेंकडे परत येईल, त्याचा निवडणुकीत कार्यक्रम करू असा इशाराही त्यांनी दिला.

---------

### कौशल्य विकासामुळेच

कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा बोलत होते. यावेळी केंद्रीय कौशल्य विकास विभागाच्या सचिव देबश्री मुखर्जी, राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण परिषदच्या कार्यकारी सदस्य डॉ. विनीता अग्रवाल, संचालक गुंजन चौधरी, महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा, आयुक्त लहूराज माळी, व्यवसाय व शिक्षण प्रशिक्षण संचालनालयाच्या संचालक माधवी सरदेशमुख, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. अपूर्वा पालकर यांसह महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दमण-दीव तसेच दादरा-नगर हवेली येथील कौशल्य विकास विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

---------

### लाडक्या बहिणीच्या प्रचार प्रसारावर

केला आहे प्रामुख्याने वृत्तवाहिनी प्रिंट मीडिया आणि सोशल मीडियावर हा खर्च केला असल्याचे माहितीच्या अधिकारातून पुढे आले आहे.

राज्यात महायुतीची सत्ता स्थापन होण्यासाठी लाडक्या बहिणीचा मोठा हातभार लागल्याची कबुली राज्याचे मुख्यमंत्री दोन्ही मुख्यमंत्री यांनी यापूर्वी दिली आहे लाडक्या बहिणीला प्रति महा दीड हजार रुपये राज्य शासन देत आहे या निर्णयावर अनेकांनी टीका केली विशेषता अनेक योजनांचा निधी लाडक्या बहिणीकडे वळवला गेला त्यामुळे राज्यातील सिंचन रस्ते बांधकाम आधी विकास कामाला खेळ बसल्याचे दिसत आहे बांधकाम विभाग पाणीपुरवठा रस्ते विकास या ठिकेदाराचे लाखो रुपये शासनाकडे थकलेले आहेत अनेक वेळा मागणी करूनही ठेकेदारांना पैसा उपलब्ध होत नाही याशिवाय काही विकास कामावर ब्रेकही लागण्याची चित्र राज्यात निर्माण झाले आहेत प्रामुख्याने लाडकी बहीण योजना सुरू करत असताना त्याची प्रसिद्धी प्रचार करण्यासाठी निर्मिती साहित्य आकाशवाणी दूरदर्शन प्रिंट मीडिया एफ एम वाहिन्या सोशल मीडिया यावर एकत्रित चार कोटी ९२ लाख अठरा हजार रुपयाचा खर्च राज्य शासनाने केला आहे माहिती अधिकार कार्यकर्ता निलेश चाळक यांनी माहितीच्या अधिकारांमध्ये मागवलेल्या माहितीमुळे हा खर्च बाहेर आला आहे या योजनेच्या प्रसार आणि प्रसिद्धी मध्ये निर्मिती साहित्यासाठी एक लाख रुपये पीव्हीसी ६० सेकंदाच्या दराने पाच जणाला ३५ लाख रुपये असे ३८ लाख २५ हजार दूरदर्शन सात दिवसासाठी जाहिरातीचे दहा लाख आकाशवाणी केंद्रावर सात दिवसासाठी २५ लाख मराठी वृत्तवाहिन्यांना ४५ ते ६० सेकंदाच्या जाहिरात प्रसारणासाठी एक कोटी रुपये एफएम वाहिन्यावर जाहिरातीसाठी ७० लाख रुपये सोशल मीडियावर पंधरा दिवसाच्या जाहिरातीसाठी ५० लाख रुपये एसटी महामंडळातील बस स्थानकामध्ये सार्वजनिक उद्घोषणा शहरी आणि ग्रामीण भागात १५ दिवसांसाठी ६० लाख रुपये एसटी स्थानकातील एलईडी वर जाहिरात करण्यासाठी ६० लाख रुपये बेस्ट बसेस वर जाहिरातीसाठी ६० लाख रुपये असा एकूण चार कोटी ७३ लाख २५ हजार आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनाला येणाऱ्या कार्यालयीन उपकरणावरील खर्चासाठी १८ लाख ९३ हजार असा एकूण चार कोटी ९२ लाख १८ हजार रुपये एवढा खर्च लाडक्या बहिणीच्या प्रसार आणि प्रसिद्धीसाठी राज्य शासनाने केला आहे.

-------------

### एसटी कर्मचाऱ्यांचा

परिवहन महामंडळातील सेवा शक्ती एस टी कर्मचारी संघटनेने आपल्या प्रलंबित मागण्या निकाली न काढल्यास मोठ्या आंदोलनाचा इशारा दिला आहे. वेतन, भत्ते, ७ वा वेतन आयोग आणि दिवाळी बोनस यांसह विविध मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा २८ सप्टेंबरपासून आक्रमक आंदोलन आणि १ ऑक्टोबरपासून मुंबईतील मुख्यालयासमोर सर्व स्तरांवरील कर्मचारी उतरतील, असा इशारा देण्यात आला आहे.सेवा शक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर हे आहेत. तर कार्याध्यक्ष आमदार सदाभाऊ खोत आहेत. २८ सप्टेंबरपासून 'आक्रमक आंदोलन' सुरू होणार असून १ ऑक्टोबरपासून मुंबईतील परिवहन मंडळाच्या मुख्यालयासमोर मोठ्या प्रमाणावर कर्मचारी धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. शासनाने वेळेत निर्णय घेतला नाही, तर उद्भवणा-या परिस्थितीची जबाबदारी सरकारवर राहील, असा इशारा संघटनेने दिला.

-------------

### आगामी निवडणुकांत सर्वत्र

चांगलेच आहे. मुंबई, ठाणे येथे शिवसेना शक्तीशाली आहे. त्यामुळे याचा फायदा त्या दोघांनाही अन महाविकास आघाडी म्हणून आम्हालाही होईल. राज्यात जातीय तेढ वाढल्याची खंत व्यक्त करत पवार म्हणाले, राज्य सरकारने राज्यात सामाजिक ऐक्य प्रस्तापित करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी परिस्थिती यापूर्वी कधीच नव्हती.सरकारने हाके किंवा अन्य कोणाच्या बोलण्याकडे लक्ष न देता सर्वांमध्ये सुसंवाद घडवून आणण्यासाठी प्रयत्न करायला हवेत; पण दुर्दैवाने तसे होत नाही. मराठा समाजाचा ओबीसींच्या यादीत आपण समावेश केला नसल्याची टीका होते या प्रश्नावर शरद पवार म्हणाले की, १९९४ मध्ये मंडल आयोगाच्या वेळी मराठा समाजाचा ओबीसीत समावेश करावा हा प्रश्न त्याकाळी उपस्थितच झाला नाही. त्यावेळी छगन भुजबळ, गोपीनाथ मुंडे यांच्यासोबत बसून निर्णय घेतले. मात्र, आता असे एकत्रित बसून निर्णय होत नसल्याकडेही पवार यांनी लक्ष वेधले.

**आयोगाने विश्वासार्हता जपावी**

निवडणूक आयोगाने विश्वासार्हता गमावली आहे. एकाचवेळी संसद सोडून ३०० खासदार निवडणूक आयोगाविरोधात रस्त्यावर उतरण्याची ही पहिली वेळ आहे. त्यामुळे आयोगाने विश्वासार्हता जपण्याची खबरदारी घ्यावी, असा सल्ला पवार यांनी दिला

------------

### पुन्हा चौथी व सातवीसाठी

हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. शालेय विभागाचे प्रधान सचिव रनजीत सिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार,राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदकुमार बेडसे, शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले. उद्घाटन सोहळ्यात शालेय शिक्षण मंत्री भुसे यांच्या हस्ते शिक्षक व अधिकारी-कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन संशोधन विभाग प्रमुख डॉ. दत्ता थिटे यांनी तर आभार विभागीय उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी मानले.कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय) व तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधा सुधारणा, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना, शिष्यवृत्ती परीक्षा व निपुण भारत अभियान यावर त्यांनी भर दिला. विद्यार्थ्यांच्या चौकसपणासाठी शैक्षणिक सहलींचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

**देशात प्रथम क्रमांकावर यावा**

शिक्षण हे आनंददायी, गुणवत्तापूर्ण, भाकरीचे आणि राष्ट्रीयत्वाचे असले पाहिजे असे नमूद करून ते म्हणाले, महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर यावा यासाठी शिक्षण विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे गरजेचे आहे.आपले राज्य देशात पहिल्या क्रमांकावर यावे अशी अशा दादा भुसे यांनी व्यक्त केली

-------------

### ४४५ महाविद्यालयाना

खासगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे नियमन) अधिनियम २०१५ च्या कलम १४ (४) नुसार महाविद्यालयांना त्यांचे शुल्क शैक्षणिक संकुलातील दर्शनी भागात; तसेच वेबसाइटवर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे. यासाठी 'एफआरए'ने दोन परिपत्रके प्रसिद्ध करून महाविद्यालयांना कळवले होते. मात्र, विद्यार्थी आणि पालकांच्या पैशांनी नफेखोरी करण्याच्या उद्देशाने नामांकित व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये शुल्क जाहीरपणे प्रसिद्ध करीत नाहीत. महाविद्यालयांच्या या मनमानी कराभाराबाबत 'महाराष्ट्र टाइम्स'ने वृत्तांद्वारे सातत्याने प्रकाश टाकला आहे. याची दखल घेऊन 'एफआरए'ने काही दिवसांपूर्वी राज्यातील ६२३ महाविद्यालयांची पडताळणी केली. ३७१ महाविद्यालयांनी शुल्क सादर केल्याची माहिती खुलाशाद्वारे पाठवली आहे. मात्र, अजूनही ७४ महाविद्यालयांनी खुलासा सादर केलेला नाही. त्यांच्यावर दंडात्मक किंवा फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचे सूतोवाच 'एफआरए'चे सचिव डॉ. अर्जुन चिखले यांनी केले आहे.

**'विद्यार्थ्यांनो, 'एफआरए'कडे तक्रारी करा'**

राज्यात 'एफआरए'ने या महाविद्यालयांची प्रत्यक्ष भेट देऊन सोयीसुविधा आणि प्राध्यापकांची संख्या तपासण्याचे दृष्टीने पावले उचलली आहेत. मात्र, तोपर्यंत विद्यार्थी आणि पालकांनी 'एफआरए'ने ठरवलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क आकारणाऱ्या महाविद्यालयांची तक्रार 'एफआरए'च्या वेबसाइटवर किंवा .. या ई-मेल आयडीवर न घाबरता करण्याचे आवाहन 'एफआरए' च्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

-------------

### अडाणी यांचे संदर्भातील व्हिडीओ सोशल

विश्वस्त एस एम देशमुख यांनी हा पत्रकारितेवर एक प्रकारे हल्ला आणि मुस्कट दाबी असल्याचा आरोप करताना या घटनेचा निषेध ही व्यक्त केला आहे प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियावर सरकारने नियंत्रण मिळवला आहे कारण देशातील वीस बड्या भांडवलदाराच्या ताब्यात ८५% मीडिया आहे वीज भांडवलदारांना ताब्यात घेऊन सरकारने मीडियाचा आवाज बंद केला आहे यूट्यूब चैनल पोर्टल आणि इंस्टाग्राम यांच्या माध्यमातून काही पत्रकार देशाचा आवाज उठवत असताना त्यांना व्यसन घालण्या चा प्रकार सरकारने सुरू केला आहे गेल्या चार दिवसांमध्ये गौतम अडाणी यांची बदनामी केल्याबद्दल पत्रकार राजू परुळेकर अभिसार शर्मा यांना गुजरात मधील एका न्यायालयाने नोटीस बजावल्या त्या पाठोपाठ आता अडाणी समूहाच्या विरोधात बदनामीकारक कंटेंट बाबत दिल्लीच्या न्यायालयाने आदेश देतात केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय देखील सक्रिय झाले आहे

-------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५ ३

## थोडक्यात...

### पि.व्ही. रोटोलसोलर योजना अतिवृष्टीमुळे झाली उद्ध्वस्त

म्हसोबावाडी । प्रतिनिधी


आष्टी तालुक्यातील उदंरखेल गावातील शरद बलभीम वामन अन्? त्यांच्या आई मंकाबाई बलभीम वामन यांच्या मालकी शेततात चक्क पाच ते सहा लाख रुपये खर्च करुन उभारलेले सोलर पि.व्ही.रोटो सॉल या शासकीय योजने अंतर्गत उभारलेले सोलर हे दि.१५सप्टेबर रोजी रात्री झालेल्या ढगफोटीमुळे पुर्ण पणे उध्वस्त झाले असुन, स्वखर्चाने बनवलेला शेत तलाव ज्याला एकूण खर्च तब्बल आठ ते नऊ लाख रुपये खर्च करुन बांधलेला एका क्षणात तो निसर्गाच्या आपत्तीने जमीन उद्ध्वस्त झाला तसेच मालकी शेतात सोयाबीन दोन एकर या भवताली नुकसान झाले असुन आमच्या कडे प्रशासनाने जातीने लक्ष देऊन लवकरात लवकर आर्थिक मदत देऊन कुटुंब सावरण्यासाठी मदत करावी व लवकरात लवकर पंचनामे करुन मदत मिळून बुडत्या कुटुंबाला हातभार लावावा असे शेतकरी शरद वामन असे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले यावेळेस ते नैसर्गिक आपत्ती समोर हातबल होऊन भावुक झाले.



### ॲड.साहेबराव म्हस्के यांना बंधुशोक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती तथा आष्टी तालुका दुध संघाचे माजी चेअरमन ॲड.साहेबराव म्हस्के यांचे जेष्ठ बंधु



सावरगावचे माजी सरपंच पैलवान हौसराव बाजीराव म्हस्के (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पाठीमागे पत्नी,दोन भाऊ,दोन मुले,एक मुलगी,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे.अंत्यविधीस आ.सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे, माजी आ.साहेबराव दरेकर,समाजसेवक विजय गोल्हार, नियामत बेग, भाऊसाहेब लटपटे,राजेंद्र दहातोंडे,यशवंत खंडागळे,बन्शीभाऊ पोकळे,बाळासाहेब शिंदे,अर्जुन औटे, रमेश मुळे,सदा दिंडे,बाबा गर्जे, अशोक ईथापे,नंदु फसले,राजकीय, सामाजिक,धार्मिक, विधी,व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.




### जय भवानीच्या विद्यार्थ्यांचा अविष्कार महोत्सवामध्ये सहभाग

पाटोदा । प्रतिनिधी

येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाचा संघ स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड या ठिकाणी आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार महोत्सव २०२५ मध्ये सहभागी झाला.

या महोत्सवामध्ये अर्थशास्त्र विभाग, समाजशास्त्र विभाग, इंग्रजी विभाग, हिंदी विभाग आणि राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर पोस्टर तयार करून स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालय बीड या ठिकाणी आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार महोत्सव २०२५ मध्ये सादरीकरण केले. विद्यापीठाच्या परीक्षकांनी या सादरीकरणाचे करण्याचे परीक्षण केले. या अविष्कार महोत्सवामध्ये सार्थक अंदुरे, कु. दिपाली पठाडे, कु.कोमल सस्ते, कु. वैष्णवी काकडे आणि हरविंदरसिंग टाक या विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण केले. हे पोस्टर तयार करण्यासाठी अविष्कार समिती समन्वयक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.शिवाजी काकडे, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.सुनील जाधव, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. विनोद कीर्दक, हिंदी विभागप्रमुख प्रा. डॉ. वंदन जाधव, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. बंडू लोखंडे, प्रा. पापाजी चव्हाण आणि प्रा. नारायण फुन्ने यांनी मार्गदर्शन केले. अविष्कार महोत्सवामध्ये संघ पाठविण्यासाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम, प्र. प्राचार्य प्रा. सोमनाथ घाडगे यांनी मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिले. महाविद्यालयाचा संघ अविष्कार महोत्सवामध्ये सहभागी झाल्याबद्दल सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.



पात्रुड : हजरत खाजा मगदूम अन्सारी रहे यांचे संडल व उर्साचे पार्श्वभूमीवर प१त्रुड येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही दर्ग्याच्या मुतवॉली इनामदार बिरादरी चे वतीने येणारे भाविक भक्तान जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती या वेळी उपस्थित मुत्वल्ली व इनामदार अनिस अन्सारी मुबीन नवाब झहीर अन्सारी रईस फराश असेफ अन्सारी ताहेर अन्सारीया सर्वांच्या वतीने ही वेवस्था करण्यात आली होती.

# प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते साहित्य संमेलनाचे होणार उद्घाटन

## संमेलनाध्यक्षपदी साहित्यिक अजयकुमार गंडले यांची निवड

**परळी । प्रतिनिधी**

**परळी येथे १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या ७ व्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे.तर संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत अजयकुमार गंडले यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती मुख्य संयोजक रानबा गायकवाड व स्वागत समितीच्या वतीने देण्यात आली आहे.**

परळी वैजनाथ येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी शिक्षण मार्गाच्या वतीने एकदिवसीय साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाचे उद्घाटन सकाळी १० वाजता होणार आहे. संमेलनात परिसंवाद, कथाकथन, कवी संमेलन आदी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. तर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे.



या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कवी व विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांच्या हस्ते होणार आहे. प्रभाकर साळेगावकर यांचे वादळ (कविता संग्रह) हळवे ठसे( हायकू संग्रह) तूच आमची शान (बालकविता संग्रह) आंघोळीचे झाड (बालकथा संग्रह) तसेच पाणी बाणी हा संपादित कवितांचा संग्रह प्रकाशित झालेला आहे.

कवी ,विडंबनकार प्रभाकर साळेगावकर यांना त्यांच्या साहित्य लेखनाबद्दल आचार्य अत्रे आद्य विडंबनकार राज्यस्तरीय पुरस्कार, यशवंत साहित्य गौरव पुरस्कार ,उत्कृष्ट वांडमय निर्मिती पुरस्कार नागोठाने जिल्हा सांगली, लोकसंवाद पुरस्कार उंमरी ,जिल्हा नांदेड, सुबदा प्रतिष्ठान ,सेलू यांचा वांडमय पुरस्कार, स्वर्गीय प्रमोद महाजन साहित्य पुरस्कार, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुरस्कार आदी पुरस्काराने आतापर्यंत सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील विद्यापीठाच्या प्रथम वर्ष मराठी पुस्तकात हायकूचा समावेश करण्यात आलेला आहे. एशियन पोएट्रीमध्ये मराठीतील कवी म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रात तसेच गोवा राज्यातील अनेक साहित्य संमेलनात निमंत्रित कवी म्हणून यांची उपस्थिती लाभलेली आहे.



संमेलनाध्यक्षपदी निवड झालेले अजयकुमार गंडले हे परभणी येथील भदंत उपाली हायस्कूल येथे इंग्रजी विषयाचे शिक्षक आहेत. व्याख्याते, विचारवंत म्हणून त्यांची सर्वदूर ख्याती आहे.त्यांचा नवराष्ट्र निर्माते: डॉ.बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ प्रकाशित झालेला आहे. तर विश्व मानवतावादाचे आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकर हा ग्रंथ लवकरच प्रकाशित होणार आहे. अजयकुमार गंडले यांचे धर्मयुद्धातील वणवा, साक्षरता काळाची गरज, व्यसनाधीनता व आजचा युवक, अंधारातून प्रकाशाकडे, डॉ. बाबासाहेबांचे राष्ट्रप्रेम, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच महिलांचा सन्मान, भारतीय संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सर्वोच्च योगदान,तसेच दैनिक सम्राटचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर शतकोत्तरी जयंती महोत्सव निमित्ताने युनोमध्ये प्रकाशित झालेल्या महा विशेषंकामध्ये लेख प्रकाशित झालेला आहे. याबरोबरच शेतकरी, कामगार, महिला, उपेक्षित, सामाजिक, शैक्षणिक विषयांवर त्यांनी लेखन केले आहे.साहित्यिक अजयकुमार गंडले यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य पुरस्कार नागपूर येथील भारतीय बहुजन समाज पुरस्कार अमरावती तसेच महात्मा फुले आदर्श शिक्षक पुरस्कारांसह गौरविण्यात आलेले आहे.

# चौसाळा येथे शेतकऱ्यांसाठी रसायनमुक्त शेती संदर्भात प्रशिक्षण

चौसाळा । प्रतिनिधी

रसायनमुक्त शिवार व रोग मुक्त गाव या मोहिमेअंतर्गत चौसाळा येथे शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्नसलोखा प्रस्थापन संस्था, छत्रपती संभाजीनगर व महा ऍग्रो एफ पी ओ फेडरेशन पुणे मार्फत रसायनमुक्त शिवार व रोगमुक्त गाव या मोहिमेअंतर्गत १७ सप्टेंबर रोजी शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न झाला .मराठवाडा मुक्ती दिनी चौसाळा परिसरातील शेतकऱ्यांसाठी महावीर गोरक्षण संस्था चौसाळा येथे सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत मोफत सेंद्रिय शेती शेतकरी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आलेले होते. रासायनिक खताचा वापर बंद केला व सेंद्रिय खते वापरली तर आपले उत्पादन कमी होणार नाही तर २० टक्के आणि उत्पादन वाढेल, शेतीचा कस वाढेल, शेतीसाठी उपयुक्त असलेले गांडूळ, मधमाश्या , व अनेक निरुपद्रवी कीटक यांची हानी होणार नाही. पिकासाठी लागणाऱ्या एकरी खर्चात ३० टक्के बचत होईल व पर्यावरणाचा समतोल राखता येईल याबाबत महा ऍग्रो चे कृषी तज्ञ श्री गोविंद डाके यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. रसायनमुक्त अन्नधान्य व भाजीपाला ही काळाची गरज असून सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले फळे भाजीपाला व अन्नधान्य आरोग्यासाठी आवश्यक असून त्यामुळे रोग मुक्त गाव ही संकल्पना अमलात आणण्यास मदत होईल असे श्री डाके यांनी प्रतिपादन केले. . या परिसरात रब्बी मध्ये घेतली जाणारी पैसा देणारी पिके म्हणजे कांदा, राजमा ,ऊस या पिकाच्या विविध रोगांबाबत उपचाराबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. गहू ज्वारी हरभरा या परंपरागत पिकांना सेंद्रिय पद्धतीने पीकवण्यासाठीआवश्यक असलेली सेंद्रिय खते औषधी याबाबत माहिती दिली. मुळापासून फळापर्यंत व शेताच्या माती पासून पिकाच्या उत्पन्नापर्यंत रब्बी पिकासाठी संपूर्ण पिक वार माहिती प्रशिक्षणात दिली . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सलोखा प्रस्थापन संस्थेचे अध्यक्ष डॉ बी.एस नाईकवाडे यांनी केले तर प्रमुख उपस्थित यामध्ये श्री अशोक लोढा, श्री जयसिंग जाधव, भाऊसाहेब शिंदे, रामभाऊ नाईकवाडे, बंटी तुपे, चंद्रशेखर नाईकवाडे, भगवान कदम, डॉक्टर निळकंठ डाके व परिसरातील इतर प्रगतिशील शेतकरी हजर होते.



## जयभवानीत मुक्त विद्यापीठाचे बी.ए.चे प्रवेश सुरू

पाटोद । प्रतिनिधी

दिनांक:८ जुलै : पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा येथे.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक चे केंद्र क्रमाक २२१६४ या केंद्रामध्ये नौकरी करत असलेल्या विद्यार्थ्यांना बहिस्थ उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.बी.ए.प्रथम,द्वितीय,तृतीय वर्ष ,या वर्गाचे प्रवेश सुरू झाले आहेत.तरी पाटोदा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांना बहिस्थ म्हणुन बी.ए. वर्गाला प्रवेश घेवयाचे असतील त्यांनी ३० सप्टेबर पर्यंत महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा.प्रवेशाच्या अधिक माहिती साठी केंद्र संयोजक प्रा.डॉ. वंदन जाधव, संपर्क मो.(९४२१३३९३५५) साह्यक केंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे संपर्क मो.न.( ८६६८२७१५१९ ) व तंत्र स्नेही श्री.दिपक जावळे संपर्क मो.नं.(९०९६७१४४१३)श्री. रमेश गिरे संपर्क मो.न.( ८२७५००३७३३ ) यांच्याशी संपर्क साधावा असे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम, अभ्यास केंद्राचे केंद्र प्रमुख प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे,केंद्र संयोजक प्रा.डॉ.वंदन जाधव,सहकेंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी कळविले आहे.

## जिजामाता कॉलेजमध्ये एडस् नियंत्रण कार्यक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग अँड जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे दिनांक १९ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीटीसी माजलगाव यांनी इंटसिफाइड आवरणेस कॅम्पिंग जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग अँड जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपी येथे कार्यक्रम घेण्यात आला संदीप नाईक यांनी एच आय व्ही एड्स कसा होतो त्याची लक्षणे कोणती उपचार पद्धती आहार व्यायाम व्यसन टीबीमुळे होणारे दुष्परिणाम यावर माहिती दिली. शेख शहाबुद्दीन समुपदेशक यांनी टीबी १०९७ टोल फ्री क्रमांक २०१७ चा कायदा एच आय व्ही एड्स टेस्टिंग महत्व विवाहपूर्व एचआयव्ही तपासणी करून घेण्याची समुपदेशन केल आय ई सी वाटप केले मोठ्या संख्येने युवक युवती उपस्थित होते तसेच या कार्यक्रमासाठी जिजामाता नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य एन विनोद कुमार सर जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉक्टर आनंद बाबू , इरफान पठाण सर व सर्व प्राध्यापक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## चांगले दिसण्यापेक्षा चांगलं असणे महत्त्वाचे - डॉ. वृषाली किन्हाळकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माणसाला आयुष्य न्याहाळून पाहता आले पाहिजे.सुंदर दिसण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील आहोत परंतु माणसाने चांगले दिसण्यापेक्षा चांगले असणे महत्त्वाचे असल्याचे मत प्रसिद्ध साहित्यिका व कवी डॉ.वृषाली किन्हाळकर यांनी सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत बोलताना व्यक्त केले.**




सुंदरराव सोळंके महाविद्यालयात माजी उपमुख्यमंत्री सुंदरराव सोळंके यांच्या जयंतीनिमित्त तीन दिवसीय व्याख्यानमालेच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यप्रकाश रुद्रवार होते.प्रमुख व्याख्यात्या म्हणून प्रसिद्ध साहित्यिका डॉ.वृषाली किन्हाळकर होत्या. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ.एन.के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, समन्वयक प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड ,प्रा.स्नेहल पाठक,प्रबंधक सतीश एरंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प गुंफतांना डॉ.वृषाली किन्हाळकर म्हणाल्या की, संस्कृती मधील बदल हा अनिवार्य आहे.संस्कृती बदलत असते.या बदलात नव्या व जुन्यातील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे अपेक्षित असते.आपण भौतिक संस्कृतीच्या मागे लागलो आहोत.भौतिक सुविधा आपल्या हातात ठेवा. तंत्रज्ञानाच्या हातात आपण जाऊ नका. माणुसकी म्हणून असलेली गुणवत्ता वाढवावी. यावेळी उपप्राचार्य डॉ.एम. ए.कव्हळे यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समन्वयक प्रा.डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा.अशोक दौंडे यांनी मानले. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# हिंदी भाषेत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध -डॉ. दिलीप गिऱ्हे

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथील वसुंधरा महाविद्यालयात हिंदी विभागात द्वारा आयोजित हिंदी दिन समारोह मध्ये प्रमुख अतिथी म्हणून नवगण महाविद्यालय परळीचे हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप गि-हे बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे होते तर प्रमुख पाहुणे नवगण महाविद्यालय परळीचे प्रा.डॉ. दिलीप गि-हे होते. यावेळी मंचावर समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा .डॉ मनीषा देशमुख हिंदी प्रमुख प्रा. डॉक्टर वैजापूर प्राध्यापक डॉ. गजानन सवने उपस्थित होते. यापुढे . डॉ. दिलीप गि-हे म्हणाले की, हिंदी भाषेत आज अनेक रोजगार निर्माण झाले आहेत. टीव्ही चॅनेल, संचार माध्यम, पत्र पत्रिका, रेडिओ जॉकी, पटकथाकार, गीतकार ,अध्यापन आदी क्षेत्रांमध्ये रोजगार उपलब्ध आहेत .त्यामुळे विद्यार्थ्यांनी हिंदी भाषांमध्ये करिअर म्हणून निवड राहावे असे प्रतिपादन केले तर अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. मोरे यांनी हिंदी भाषेचे महत्त्व सांगून त्या भाषेची गुण व विशेषतावर भाष्य केले. यावेळी हिंदी विभाग द्वारा शब्दकलस भितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.तसेच स्वप्नाली आवड या विद्यार्थी ला खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई ते निबंध स्पर्धेत द्वितीय क्रमांक प्राप्त झाल्यामुळे सत्कार करण्यात आला व तिने यावेळी आपलेमनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिंदी प्रमुख प्रा. डॉ.बायजा कोटुळे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. डॉ.गजानन सवणे व आभार प्रा. डॉ. जगन्नाथ तुडमे मांनले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी दिला आपल्या लाडक्या शिक्षकांना साश्रु नयनांनी निरोप

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील केंद्रीय जि.प.प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या नुकत्याच बदल्या झाल्या होत्या त्यामुळे त्यांना आज शाळेच्या व विद्यार्थ्यांच्या वतीने निरोप देण्यात आला.यावेळी शिक्षकांना व विद्यार्थ्यांना आपले अश्रु आनावर झाले.

नुकतेच प्रशासनाने शिक्षकांच्या बदल्या केल्या होत्या यामध्ये युसुफवडगांव केंद्रीय जि.प.प्राथमिक शाळेतील सुद्धा शिक्षकांच्या बदल्या झालेल्या होत्या त्यामुळे त्यांना आप आपल्याला बदली झालेल्या शाळेवर उपस्थित राहण्याचे आदेश दिल्याने आज शालेय व्यवस्थापन समितीच्या व विद्यार्थ्यांच्या वतीने त्यांना निरोप देण्यासाठी निरोप समारंभचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी बदली झालेले शिक्षक वाय.एम स्वामी,सहशिक्षिका श्रीमती आर.जी स्वामी,श्रीमती पी.एम पाटील,श्रीमती डी.आर केजकर,श्रीमती जे.पी गवळी,श्रीमती एस बी चव्हाण या शिक्षकांनी शाळेचा दर्जा व विद्यार्थी घडण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्याचे गावकरी व शालेय शिक्षण समिती विद्यार्थ्यांच्या वतीने आभार मानुन त्यांचा यथोचित सत्कार करून त्यांना निरोप देण्यात आला यावेळी शिक्षकांना शाळा सोडुन चाललो म्हणुन तर विद्यार्थ्यांना आपले आवडते शिक्षक निघुन चालल्याने अश्रु अनावर झाले.



यावेळी मुख्याध्यापक शिवहार चोपणे,अध्यक्ष ओमकार लामतुरे,उपाध्यक्ष चंद्रकांता निशिगंध,ग्रा.प.सदस्य संध्या लांडगे,राचलिंग पाटील,अनिल उजगरे,जयराज निशिगंध,खंडु डोंगरे,मयुर खंडेलवाल,सुशांत निकम,पप्पु झोरी,यश वायकर तसेच मोठ्या संख्येने शिक्षकांना निरोप देण्यासाठी पालक-माता भगिनी उपस्थित होत्या तर या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन धिरज इरगट यांनी केले.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने सुर्यपुत्रास स्मृतिदिनी अभिवादन



माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा माजलगाव यांच्या विद्यमाने सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन के कॅम्प येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र,चैत्यभूमीचे शिल्पकार , बौद्धाचार्यांचे जनक सुर्यपुत्र भैय्यासाहेब ऊर्फ यशवंत भिमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिना निमित्त अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते.या कार्यक्रमाची सुरुवात पुज्य भन्ते धम्मप्रिय थेरो यांनी उपस्थित धम्म उपासक उपासिका यांना त्रिसरन पंचशील देऊंन करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी भन्ते बुद्धघोष ,भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे,महिला जिल्हा संस्कार उपाध्यक्ष लिलाताई उजगरे, महिला जिल्हा संस्कार सचिव आशाताई मोरे, जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे ,जिल्हा संघटक बी सी डोंगरे, शहर अध्यक्ष एल आर मस्के हे उपस्थित होते या ठिकाणी भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्वच्या वतीन वर्षावास कालावधीत चालु असलेल्या धम्मप्रवचन मालीकतील विषय सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांचे महान कार्य या विषयी एस बी मोरे यांनी सखोल मार्गदर्शन केले के व्ही साळवे यांनी अभिवादन पर भाषन केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक महिला तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेचे संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे यांनी केले तसेच आभार डी एस साळवे यांनी मानले या नंतर आशिर्वाद व शरणतय घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,मोहन काकडे, बाबासाहेब घनघाव,,विशाखाताई वाघमारे,पोहरेताई, चंद्रकला साळवे,निलावती साळवे,यांच्या सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले

**कार्यालय नगरपंचायत घनसावंगी जि. जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

PH no02483-271787

npghansawangi@gmail.com

दूरध्वनी क्रमांक ०२४८३२२००२६

जा.क्रं. २०२५/नपघ/जा.प्र./कावी- १७६६

दिनांक:-१८/०९/२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार सागरबाई देवराव खंडागळे रा. पिंपळगाव सरई ता. जि.बुलढाणा यांनी नामे सलमा युसूफ अन्सारी रा.डोंगरी अंधेरी वेस्ट मुंबई यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं ४८६६ दि. ०९/०९/२०२५ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं २६१६ दिनांक:- ११/०९/२०२५ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. सलमा युसूफ अन्सारी रा. ता. डोंगरी अंधेरी वेस्ट मुंबई नावावर असलेला गट नं (-) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १६६८ मधील क्षेत्र ७४.३४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे. पुर्व :- रस्ता, पश्चिम :- सखाराम यांची जागा, दक्षिण :- विक्रेत्याची उर्वरित जागा, उत्तरेस :- विक्रेत्याची उर्वरित जागा या वरील चतुःसिमा मधील ७४.३४ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
मुख्याधिकारी
नगरपंचायत घनसांवगी

# सांगोला तालुक्यात ढगफुटी, शेकडो घरांमध्ये शिरलं पाणी, शेती पिकांचेही नुकसान

राज्याच्य विविध भागात सध्या मुसळधार पाऊस सुरु आहे. या पावसामुळं अनेक भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. नदी नाल्यांना पूर आले आहेत. यामुळं शेती पिकांचं देखील मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचं चित्र दिसत आहे. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात देखील ढगफुटी झाली आहे. या पावसामुळं शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. तसेच शेकडो घरांमध्ये पाणी शिरलं आहे. त्यामुळं मोठं नुकसान झालं आहे.

एका रात्रीत १७० मिलिमीटर पाऊस

दुष्काळी सांगोल्याला ढगफुटीचा मोठा दणका बसला आहे. एका रात्रीत १७० मिलिमीटर पाऊस पडला आहे. तर शेकडो घरात पाणी शिरले आहे. कायम दुष्काळी अशी ओळख असणाऱ्या आणि पाण्याच्या टँकरवर सहा महिने काढणाऱ्या सांगोला तालुक्याला काल रात्री ढगफुटीने मोठा दणका दिला असून पुढे नाले कडलास जवळा आणि सोनंद या तीन सर्कल मधील अनेक गावांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे. कडलास वाटंबरे खटकाळेवाडी अशा अनेक गावातील



लोकांचे सामान पावसात वाहून गेलेले असून ग्रामस्थ असाह्य बनले आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली तर शेतातील खरीप व रब्बी पिकांना याचा फार मोठा फटका बसला आहे.



गेल्या काही दिवसांपासून सर्वदूर मुसळधार पाऊस सुरू आहे. सप्टेंबर महिन्यात पिकांची मोठी हानी झाली आहे. अतिवृष्टीचा सर्वच जिल्ह्यांना फटका बसत असून शेतकऱ्यांच्या शेतातील पिके पुर्णपणे पाण्याखाली गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग मोठ्या प्रमाणावर अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी केली जात आहे. तर ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी देखील जोर धरू लागली आहे. याबाबत आता कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी महत्वाचं भाष्य केलं आहे.

आतापर्यंत ३० जिल्ह्यातील ६२ लाख १७ हजार ५४० एकर क्षेत्रात शेती पिकाचे नुकसान

कृषीमंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. हवामान बदलामुळे एकाच वेळेस मोठा पाऊस होतोय. शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत ३० जिल्ह्यात १९५ तालुक्यात ६५४ महसूल मंडळामध्ये ६२ लाख १७ हजार ५४० एकर क्षेत्रात शेती पिकाचे नुकसान झाले आहे. यावर सरकारचे लक्ष आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री, अधिकारी नुकसानीची पाहणी करत आहे. ज्यांचे नुकसान झाले, त्याबाबत पंचनामा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासन मदत करेल, असे आश्वासन त्यांनी दिली आहे.

---

# चुनखडीयुक्त जमिनीमध्ये ऊस पिकासाठी पोषक अन्नद्रव्य व्यवस्थापन

ज्या जमिनीमध्ये मुक्त चुन्याचे (कॅल्शिअम कार्बोनेट) प्रमाण जास्त असते, त्या जमिनीस चुनखडीयुक्त जमीन म्हणतात. सर्व साधारणपणे मुक्त चुन्याचे प्रमाण जर पाच टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर अशी जमीन चुनखडीयुक्त समजावी. या जमिनीत चुन्याचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त झाल्यास अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेवर परिणाम होतो.

चुनखडीयुक्त जमिनीचे गुणधर्म : सामू ७.५ पेक्षा जास्त असतो. सेंद्रिय कर्ब कमी असतो. मुक्त चुन्याचे प्रमाण पाच टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असते. अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते : प्रामुख्याने स्फुरद या मुख्य आणि मॅग्नेशिअम, गंधक या दुय्यम तसेच लोह, जस्त, मँगेनीज व बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते.

जमीन चुनखडीयुक्त होण्याची कारणे : चुनखडीयुक्त जमिनी तयार होण्याची प्रमुख कारणे म्हणजे वातावरणातील बदल आणि जमीन कुठल्या खडकापासून बनलेली आहे हे तपासणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील बहुतांश भागातील जमिनी बेसॉल्ट खडकापासून तयार झाल्या आहेत. बेसॉल्ट खडकाचे विघटन होत असताना कॅल्शिअम आणि मॅग्नेशिअम बाहेर पडतो, त्याचे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड सोबत रासायनिक अभिक्रिया होऊन जमिनीमध्ये चुनखडी तयार होते. यालाच अजैविक कार्बन म्हणतात.

कमी पर्जन्यमान आणि जास्त तापमान : जमिनीमध्ये चुनखडी तयार होण्यासाठी पडणारा पाऊस आणि तापमान यांचा संबंध असतो. ज्या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी आणि तापमान जास्त असते, अशा ठिकाणी चुनखडीयुक्त जमिनी तयार होतात.

अन्नद्रव्यांची उपलब्धता आणि परिणाम : पिकांसाठी योग्य अन्नद्रव्याची निवड आणि वाढीनुसार पुरवठा केल्यास उत्पादनक्षमता वाढविण्यास मदत होते. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये जमिनीचा सामू (७.५) आणि चुन्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे अन्नद्रव्यांची उपलब्धता कमी होते.

जमिन सुधारण्याच्या उपाययोजना :जमिनीची मशागत खोलवर होण्यासाठी उभी व आडवी नांगरट करावी. त्याचबरोबर दर तीन ते चार वर्षांनी एकदा सबसॉयलरचा वापर करावा. जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी (शेणखत, कंपोस्ट खत, गांडूळ खत, कारखान्यामध्ये उपलब्ध असलेले बायो कंपोस्ट) यासारख्या सेंद्रिय खतांचा वापर करावा. तसेच या जमिनीमध्ये ताग,धैंचा यासारखी हिरवळीचे पीक घेणे फायदेशीर ठरते. जमिनीमध्ये पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने व्हावा याची काळजी घ्यावी. गरज पडल्यास निचरा प्रणालीची व्यवस्था करावी. रासायनिक खतांचा वापर माती परीक्षणावर आधारित करावा, शक्यतो चुनखडीयुक्त जमिनीमध्ये डाय अमोनियम फॉस्फेट, युरिया सोबत अमोनियम सल्फेट, म्युरेट ऑफ पोटॅश सोबत सल्फेट ऑफ पोटॅश यासारख्या खतांचा वापर करावा. चुनखडीयुक्त जमिनीमध्ये पाणी व्यवस्थापन ठिबकद्वारे करावे. जेणेकरून जमीन ही सतत वापसा स्थितीत राहील. तसेच ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खतांचा वापर केल्यास अन्नद्रव्याची उपलब्धता वाढेल. स्थिरीकरण झालेल्या अन्नद्रव्याची उपलब्धता होण्यासाठी जिवाणू खतांचा वापर करणे गरजेचे आहे. स्फुरद विघटन करणारे जिवाणू तसेच पालाश विघटन करणाऱ्या जिवाणू खतांचा वापर करावा.



# पाणथळ जमिनीमध्ये अशा करा उपाययोजना

कोणत्याही वनस्पतीच्या वाढीसाठी पाण्याची आवश्यकता असली तरी एका मर्यादेपेक्षा अधिक पाणी झाल्यास त्यात पिकाची वाढ उत्तम होत नाही. वनस्पतींच्या संतुलित वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारी जमिनीतील पाणीपातळी ही मातीच्या विविध गुणधर्मांवर परिणाम करते. विशेषतः दीर्घकाळ पाणी साचून राहत असलेल्या जमिनीला मृदा जलसाठण म्हणतात. अशा जमिनीमध्ये हवा खेळती राहत नसल्याने मातीच्या भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांमध्ये खूप बदल होतात. अशा जमिनीत पीक घेणे कठीण होते. या स्थितीत पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करून घेण्याच्या उपाययोजना राबवाव्या लागतात. त्यातून जमिनीच्या गुणधर्मात आवश्यकतेनुसार बदल करून पीक उत्पादन घेता येते. बहुतांश सर्व वनस्पतींच्या चांगली वाढ आणि उत्पादनासाठी मातीतील कणांच्या पोकळीमध्ये कमाल ७५ टक्के पाणी आणि २५ टक्के हवा भरलेली असणे चांगले मानले जाते. त्यामुळे झाडांची मुळे हवेविना गुदमरत नाहीत.



जमिनीत पाणी साचण्याची प्रमुख कारणे :जमिनीत पाण्याची पातळी जास्त असणे. पावसाचे पाणी कमी असणे. मातीच्या थरात खडक किंवा चिकणमातीचा थर असल्यामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित न होणे. चिकणमातीचे अधिक प्रमाण आणि मातीची क्षारता इ. परिस्थितीमुळे पाणी साचण्यास प्रोत्साहन मिळते.

माती पाण्यात मिसळण्याचे प्रकार : अतिवृष्टी किंवा पूरपरिस्थितीमुळे तात्पुरत्या स्वरुपात जमिनीत पाणी साचते. समुद्राचे पाणी आसपासच्या जमिनीवर पसरून जमिनी पाण्याखाली बुडणे. पावसाळ्यात वाहणारे पावसाचे पाणी जमिनीच्या खोलगट भागामध्ये जमा होत राहते. जमिनीची उंचसखलपणामुळेही पाणी साचण्यास प्रोत्साहन मिळते. पावसाळ्यात भूगर्भातील पाण्याचा उपसा झाल्यामुळे या प्रकारच्या जमिनी जलमय होतात.

माती पाण्यात मिसळण्याचे परिणाम : मातीत पाणी साचल्यामुळे मातीच्या छिद्रांमध्ये असलेली हवा बाहेर पडते. जमिनीतील संपूर्ण पोकळ्या पाण्याने भरतात. हवेची हालचाल रोखली जाते. पाणी सतत स्थिर राहिल्याने माती तयार होण्याची प्रक्रिया मंदावते. परिणामी मातीची घनता वाढत ती कठीण होते. सतत पाण्यात बुडल्याने जमिनीचे तापमान कमी राहते. त्याचा जिवाणूंच्या क्रियांवर परिणाम होतो. त्याचा फटका वनस्पतींना अन्नद्रव्यांच्या उपलब्ध होण्याला बसतो. मातीचा सामू कमी होत जमिनी आम्लयुक्त बनतात. पिकांना नत्र, स्फुरद, पालाश, गंधक आणि जस्त या उपलब्ध अन्नद्रव्यांची कमतरता जाणवते. तर लोह आणि मँगेनीज या अन्नद्रव्यांची अतिरिक्ततेची लक्षणे जाणवतात. पाणी साचल्यामुळे विद्राव्य क्षार, इथिलीन वायू, मिथेन वायू, ब्युटीरिक ॲसिड, सल्फाइड्स, फेरस आयन आणि मँगेनीज आयन असे काही विषारी पदार्थ तयार होतात. ते झाडांकडून उचलले गेल्यामुळे झाडांमध्ये त्यांचे प्रमाण वाढून विषारीपणा वाढू शकते. पाण्याचा योग्य पद्धतीने निचरा केल्यास मुळांच्या परिसरात मोकळी हवा खेळती राहते. परिणामी या घटकांची विषाक्तता कमी होते.

पाणी साठलेल्या जमिनींचे व्यवस्थापन : जमिनीच्या पृष्ठभागाचे सपाटीकरण योग्य पद्धतीने करावे. त्यामुळे जास्त पाणी साचत नाही. झाल्यास निचरा लवकर होतो. अनियंत्रित सिंचनामुळे जमिनीत अतिरिक्त पाणी साठते. हे टाळले पाहिजे. कालव्यातील पाणी गळतीमुळे जमिनीत पाणी साचते. या गळतीवर वेळीच उपाययोजना कराव्यात. पूरग्रस्त भागात बहुतेक शेतीयोग्य जमिनी पाण्याखाली जाऊन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. म्हणून या भागात बांध टाकून पाण्याचा प्रवाह नियंत्रित केला जाऊ शकतो. अशा शेतामध्ये जास्त पाण्याची आवश्यकता असणाऱ्या झाडांची लागवड करणे. उदा. सॅलिक्स, मूंज गवत, सदाहरित झाडे, शिशम, सफेडा आणि बाभूळ अशा काही झाडांच्या प्रजाती जास्त बाष्पोत्सर्जन करून भूगर्भातील पाणी पातळी कमी करण्यास मदत करतात. अनेक पिके काही प्रमाणात जमिनीतील पाणी साचण्याची स्थिती सहन करू शकतात. पिकाच्या पाणी सहनशीलतेनुसार निवड करता येते. साधारणपणे ओलसर जमिनीत चिकणमाती आणि सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जास्त असते. जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा व्यवस्थित निचरा करण्यासाठी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३३ : पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याचे प्रतिपादन केल्याबद्दल गॅलिलिओ यांच्यावर खटला चालवण्यात आला.
१८५७ : चा राष्ट्रीय उठाव ब्रिटिश (ईस्ट इंडिया कंपनीच्या) सैन्याने दिल्ली परत ताब्यात घेतली.
१८७८ : भारतातील सर्वाधिक प्रचलित इंग्रजी भाषिक वृत्तपत्र द हिंदूचे प्रकाशन साप्ताहिक वृत्तपत्राच्या रूपाने सुरु करण्यात आलं.
१९१३ : वीर वामनराव जोशी यांच्या 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईत झाला.
१९४६ : पहिले कान्स फिल्म फेस्टिव्हल आयोजित केले गेले.
१९७३ : बॅटल ऑफ सेक्सेस ह्यूस्टन, टेक्सास येथे बिली जीन किंग या महिलेने बॉबी रिग्ज या पुरूषाचा लॉन टेनिसमधे पराभव केला.
१९७७ : व्हिएतनामचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
२००१ : अमेरिकेने दहशतवादाविरुद्ध युद्ध पुकारले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५३ : चुलालोंगकोर्ण तथा राम (पाचवा) थायलँडचा राजा (मृत्यू: २३ आक्टोबर १९१०)
१८५६ : साली भारतातील आध्यात्मिक नेते आणि समाजसुधारक नारायण गुरु यांचा जन्मदिन.
१८९७ : नारायण भिकाजी तथा 'नानासाहेब' परुळेकर 'सकाळ' वृत्तपत्राचे संस्थापक संपादक, प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाचे अध्यक्ष व भारतीय पत्रकारितेचे पितामह, स्वच्छ समाजदृष्टी, उक्ती व कृती यातील करडी शिस्त या असाधारण गुणांमुळे नानासाहेब परुळेकर हे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी पत्रकारितेतील सदैव स्मरणात रहावे, असे व्यक्तिमत्त्व ठरले. त्यांना पद्मभूषण सन्मानाने गौरविण्यात आले होते. 'निरोप घेता' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ८ जानेवारी १९७३)
१९०९ : गुलाबदास हरजीवनदास ब्रोकर गुजराती लेखक व समीक्षक, पद्मश्री (१९९१), गुजराती साहित्य परिषदेचे अध्यक्ष, गुजरातीतील मनोविश्लेषणात्मक कथेची सुरुवात करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. (मृत्यू: १० जून १९०६ पुणे)
१९११ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कार्यकर्ते श्रीराम शर्मा यांचा जन्म (मृत्यू: २ जून १९९०)
१९२१ : क्रिकेटपटू पनानमल पंजाबी यांचा जन्म.
१९२२ : द. न. गोखले चरित्र वाङ्मयाचे गाढे संशोधक, मराठी शुद्धलेखनाचे अभ्यासक, पुणे विद्यापीठाने त्यांना डी. लिट पदवी देऊन गौरविले होते.
१९२३ : भारतीय अभिनेते आणि निर्माते अक्किनेनी नागेश्वर राव यांचा जन्म (मृत्यू: २२ जानेवारी २०१४)
१९२५ : आनंद महिडोल तथा राम (सातवा) थायलँडचा राजा (मृत्यू: ९ जून १९४६)
१९३४ : भारतीय व्यंगचित्रकार आणि पत्रकार राजिंदर पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १६ फेब्रुवारी २०१५)
१९४४ : क्रिकेटपटू रमेश सक्सेना यांचा जन्म.
१९४६ : भारतीय वकील आणि न्यायमूर्ती मार्कंडेय काटजू यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : दिल्ली येथील तुघलक वंशीय सत्तेचे सम्राट शासक फिरोज शाह तुगलक तृतीय यांचे निधन.
१८१० : मीर तकी मीर ऊर्दू शायर (जन्म: १७२३)
१९१५ : संत गुलाबराव महाराज (जन्म: ६ जुलै १८८१)
१९२७ : पॅन-इस्लामिक चळवळीबद्दल सहानुभूती असलेले भारतीय क्रांतिकारक अब्दुल हाफिज मोहम्मद बराकतउल्ला यांचे निधन.
१९२८ : केरळमधील समाजसुधारक नारायण गुरू यांचे निधन.
१९३३ : ॲनी बेझंट थिऑसॉफिस्ट, सामाजिक कार्यकर्त्या व भारतीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्या, त्यांनी हिंदू धर्म व संस्कृतीचे सखोल अध्ययन केले होते. त्यांनी भगवद्गीतेचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांची ग्रंथसंख्या सुमारे ४५० इतकी आहे. १९१६ मध्ये त्यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली. (जन्म: १ आक्टोबर १८४७)
१९४२ : भारत छोडो आंदोलनाच्या वेळेला राष्ट्रध्वज घेऊन निघालेल्या मिरवणुकीचे नेतृत्व करीत असतांना केलेल्या गोळीबारात थोर भारतीय क्रांतिकारक महिला कनकलता बरुआ यांचे निधन झाले.
१९७९ : चेकोस्लोव्हेकियाचे राष्ट्राध्यक्ष लुडविक स्वोबोदा यांचे निधन.
१९९६ : कवी, कथाकार, सामिक्षक, विचारवंत दगडू मारुती पवार उर्फ दया यांचे निधन.
१९९७ : कल्याण कुमार गांगुली तथा अनुप कुमार चित्रपट अभिनेते (मृत्यू: ९ जानेवारी १९२६ खांडवा, मध्य प्रदेश)
२०१२ : प्रख्यात भारतीय नाट्य दिग्दर्शक, रंगमंच, दूरदर्शन आणि हिंदी चित्रपट अभिनेते दिनेश ठाकूर यांचे निधन.
२०१५ : भारतीय उद्योजक जगमोहन दालमिया यांचे निधन. (जन्म: ३० मे १९४०)

# मत्स्यपालनात आहार म्हणून शेवग्याच्या पानांचा वापर फायदेशीर

मत्स्यपालन करताना माशांना वेगवेगळ्या प्रकारचा आहार दिला जातो, ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि वाढ चांगली होते. माशांसाठी मोरिंगा म्हणजेच शेवग्याची पाने यापासून तयार केलेली पावडर एक उत्तम पर्याय म्हणून समोर आले आहे. मत्स्यपालनात आहारामध्ये मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहण्यास आणि मत्स्यशेती सुरळीत चालण्यास मदत होऊ शकते.

'मोरिंगा' माशांसाठी सुपरफूड : मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे हे माशांसाठी एक प्रकारचे सुपरफूड आहे. त्यामुळे माशांची रोगप्रतिकार क्षमता वाढते. मोरिंगा पानांमध्ये मासे निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेले सर्व पोषक घटक असतात. त्यात दहा प्रकारचे अत्यावश्यक अमीनो ॲसिड असतात, जे प्रथिने बनवण्यास मदत करतात. याशिवाय यामध्ये अनेक प्रकारची जीवनसत्त्वे असतात. म्हणून जर आपण मोरिंगा माशांना खायला दिले तर ते अधिक निरोगी आणि मजबूत राहतील. हे कृत्रिम अन्नापेक्षा चांगले आहे कारण ते नैसर्गिक आहे आणि त्यात कोणतेही हानिकारक रसायने नसतात. मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरल्याने मासे निरोगी राहतील आणि मत्स्यपालकांनाही फायदा होईल.

मोरिंगापासून माशांना मिळतात प्रथिने : माशांच्या वाढीसाठी आणि पुनरुत्पादनासाठी प्रथिने अत्यंत आवश्यक आहेत. संशोधनात असे आढळून आले आहे की माशांच्या बाळांना किमान ३० टक्के प्रथिने आवश्यक असतात. मत्स्यपालक सामान्यतः माशांसाठी




प्रथिनांचा स्रोत म्हणून फिश फूडचा वापर करतात परंतु, फिश फूडच्या वाढत्या मागणीमुळे, त्याच्या उत्पादनासाठी नैसर्गिक संसाधनांवरही दबाव वाढत आहे. अशा स्थितीत मत्स्य खाद्यामध्ये मोरिंगासारख्या पर्यायी प्रथिन स्त्रोतांचा वापर जलचर शेतीमध्ये वाढत आहे. मोरिंगामध्ये प्रथिने जास्त असतात आणि त्यात सर्व आवश्यक अमीनो ॲसिड असतात. त्यामुळे माशांच्या आहारासाठी मोरिंगा हा चांगला पर्याय आहे. मोरिंगा पानांच्या पावडरमुळे २५-३७ टक्के प्रथिने आहेत जे माशांच्या वाढीस मदत करतात आणि त्यांची रोग प्रतिकारशक्ती देखील वाढवतात.

मत्स्यव्यवसायात मोरिंगाचे फायदे : मोरिंगा वनस्पतीच्या पानांमध्ये, बिया आणि सालामध्ये विविध प्रकारचे फायटोकेमिकल्स असतात, जसे की फ्लेव्होनॉइड्स, फेनोलिक ॲसिड आणि अँथ्राक्विनोन. हे घटक माशांचे आरोग्य सुधारण्यास, प्रतिकारशक्ती वाढविण्यास आणि त्वचेची चमक वाढविण्यास मदत करतात. एवढेच नाही तर पारंपारिक अँटीबायोटिक्स आणि रासायनिक औषधांना मोरिंगा वापरणे हा स्वस्त आणि प्रभावी पर्याय आहे. हे माशांच्या वाढीस, त्वचेचा रंग वाढण्यास मदत करते आणि कोणत्याही हानिकारक प्रभावाशिवाय रोगांशी लढण्यास मदत करते.

शोभेच्या माशांसाठी महत्त्वाचा आहे मोरिंगा : तिलापिया, सीब्रेम, गिबल कार्प आणि गप्पी यांसारख्या शोभेच्या माशांसाठी मत्स्यपालन आहारात मोरिंगा वापरणे खूप फायदेशीर आहे, कारण अभ्यासात असे आढळून आले आहे की जर माशांच्या आहारात १० ते १५% मोरिंगा समाविष्ट केले तर मोरिंगामध्ये कॅरोटीनोइड्स असतात ज्यामुळे माशांच्या त्वचेचा रंग गडद होऊ शकतो. तसेच याचा माशांच्या वाढीवर कोणताही वाईट परिणाम होत नाही. म्हणजेच, फिश फुडपेक्षा मोरिंगा हा प्रोटीनसाठी चांगला पर्याय मानला जाऊ शकतो. मोरिंगामध्ये एक विशेष घटक आढळतो, ज्याला फिनाईल आयसोथियोसायनेट म्हणतात. यात प्रतिजैविक गुणधर्म आहेत, ज्यामुळे माशे चांगले वाढतात आणि त्यांची मर कमी होण्यास मदत होते.

माशांच्या आहारात मोरिंगाचा वापर कसा करायचा? : मोरिंगा ची पाने नीट धुवून वाळवा आणि नंतर बारीक करून पावडर बनवा. ही पावडर माशांच्या आहारात मिसळता येते, त्यामुळे माशांना अधिक पोषक द्रव्ये मिळू शकतात.

cmyk



# आ. रोहित पवार यांच्या उपस्थितीत जामखेडमध्ये आमसभा

## नागरिकांचा संताप, आमदारांकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती



जामखेड। प्रतिनिधी

कर्जतप्रमाणेच जामखेडमध्येही आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या आमसभेत नागरिकांनी प्रशासनाविरोधात रोष व्यक्त केला. अधिकाऱ्यांकडून कामे होत नाहीत, कामांसाठी पैशांची मागणी केली जाते, बोगस बिले काढण्यात आली, वर्षानुवर्षे चकरा मारुनही कामे मार्गी लागत नाहीत, साहेब त्रास देतात अशा अनेक तक्रारींचा पाढा यावेळी नागरिकांनी वाचला. आमदार रोहित पवार यांनी अधिकाऱ्यांची झाडाझडती घेत नागरिकांची कामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

आमदार रोहित पवार यांनी गुरुवारी कर्जतमध्ये सलग आठ तास एका ठिकाणी बसून आमसभा घेतली आणि उपस्थित सर्व नागरिकांच्या तक्रारी जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न केला. तसाच प्रयत्न सलग दुसऱ्या दिवशी जामखेडमध्ये आमसभा घेऊन केला. येथेही आमदार रोहित पवार यांनी दुपारी बारा ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सलग नागरिकांना वेळ देत त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि जागेवरच त्यांचे प्रश्न सोडवण्याचे आदेश दिले. काही प्रश्नांबाबत अधिकाऱ्यांना भेटून त्यांचे प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. यावेळी प्रांताधिकारी, बीडीओ, नायब तहसीलदार यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

आमसभा सुरु होण्यापूर्वी आमदार रोहित पवार यांनी अतिवृष्टीमुळे जामखेड तालुक्यात झालेल्या नुकसानीची काही गावांमध्ये जाऊन पाहणी केली. आमसभेला सुरवात होताच झालेल्या सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आणि बंधाऱ्यांशेजारील भराव वाहून गेल्याने त्याचीही दुरुस्ती करण्याबाबतच्या सूचना दिल्या. तसेच पंचनामे करताना नियमांचा बाऊ न करता कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेण्याच्याही सूचना दिल्या. पंचायत समिती, कृषि विभाग, पोलिस विभाग अशा काही विभागांच्या कारभाराबाबत नागरिकांनी प्रचंड संताप व्यक्त केला. सौताडा रस्त्याचे काम करताना गरीबांचे अतिक्रमण हटवण्यात आले मात्र काही ठरविक ठिकाणी रस्त्याचे काम रखडल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यावर येत्या आठ दिवसात उर्वरित अतिक्रमण काढून घेण्यात यावे यासाठी जिल्हा पोलिस दलाकडून विशेष पथक मागवून घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येणार असल्याचे आमदार रोहित पवार यांनी सांगितले. पंचायत समितीकडून रोजगार हमी हमी योजनेमार्फत करावयाची कामे ठप्प असल्याच्या अनेक तक्रारी नागरिकांनी केल्या. जनावरांमध्ये लंपीचा प्रादुर्भाव वाढत असूनही लसीकरण होत नसल्याची तक्रार नागरिकांनी केली. त्यावर अधिकाऱ्यांनी खोटी माहिती देताच आमदार रोहित पवार यांनी त्यांना फैलावर घेत तातडीने लसीकरण पूर्ण करण्याचे आदेश दिले. नागरिकांनी तक्रारी करूनही अधिकाऱ्यांकडून कामे करण्यास दिरंगाई होत असल्याबद्दल आमदार रोहित पवार यांनी आमसभेतच तीव्र नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांचेही कान टोचले. कोणत्याही परिस्थितीत सामान्य नागरिकांना त्रास न देता सहानुभूतीच्या भावनेतून त्यांच्या अडचणी मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या.

नागरिकांना होणारा त्रास पाहून आमसभेमध्ये अनेकदा आमदार रोहित पवार यांना अनेकदा संताप अनावर होत असल्याचे जाणवत होते, परंतु अशाही परिस्थितीत अधिकाऱ्यांची 'सार्वजनिक पूजा-आरती' नको म्हणून त्यांनी अत्यंत संयमाने परिस्थिती हाताळली. परंतु भविष्यात पुन्हा अशाच तक्रारी कायम राहिल्या तर लोक ही माझीही ऐकणार नाहीत आणि जे घडेल त्याला पूर्णतः अधिकारी जबाबदार असतील, असा इशारा मात्र त्यांनी अधिकाऱ्यांना दिला. त्यामुळं भविष्यात प्रशासनाच्या काराभारात किती सुधारणा होते, हे पहावं लागेल.

# शेतकऱ्याच्या बांधावर जावून पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केली नुकसानीची पाहणी



जालना। प्रतिनिधी

जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी गाव परिसरात शेतकऱ्याच्या बांधावर प्रत्यक्ष जावून पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी शेती पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. पावसामुळे उभी पिके जमिनदोस्त झाली असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. बदनापूर तालुक्यातील मात्रेवाडी येथील शेतकरी जनार्धन मात्रे यांच्याशी संवाद साधत झालेल्या पिक नुकसानीची माहिती जाणून घेतली. शासन नुकसानग्रस्ताच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून काळजी करु नका अशा शब्दांत बाधित शेतकऱ्यांना धीर दिला.

यावेळी त्यांनी तुर, कापुस व सोयाबीन या पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच या सर्व नुकसानीचे पंचनामे तातडीने करुन शेतकऱ्यांना मदत देण्याचे आदेश संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच अतिवृष्टीने बाधित पिकाने अतोनात नुकसान झाले असून शासन शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे मत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी आमदार नारायण कुचे, भाऊसाहेब घुगे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, नायब तहसीलदार श्री. राजमाने यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. मराठवाडा मुक्तिसंग्राम वर्धापन दिनानिमित्त जालना शहरातील टाऊन हॉल येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण झाल्यानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जालना शहरातील महापालिकेसमोरील परिसरातील शिवशक्ती ग्रीन सिटीत अतिवृष्टीने सखल भागात पावसाचे पाणी साचलेल्या भागातील रहिवासी भेट घेवून विचारपूस केली तसेच रेल्वे स्थानकाशेजारील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथील घरामध्ये पाणी साचलेल्या भागाची पाहणी केली. अतिवृष्टीने घरांचे खुप मोठे नुकसान होवून घरात पाणी शिरले आहे. या संकटात सापडलेल्या रहिवाशांना अन्न व इतर आवश्यक बाबी पुरविण्याबाबत जिल्हा प्रशासनाला नियमाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, आमदार नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर इंडियन आर्मीच्या तत्परतेमुळे शेकडो पूरग्रस्तांचे प्राण वाचले

## मदतकार्यामुळे आ.सुरेश धस यांच्या वतीने आभार व्यक्त



अहिल्यानगर

पाथर्डी तालुक्यातील झालेल्या ढगफुटीमुळे कडी नदीला आलेल्या पुरामुळे कडा,टाकळी आमिया, टाकळीसिंग,सांगवी आष्टी या सर्व गावांमध्ये नदी च्या काठी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना पाण्याने वेढले असताना एनडीआरएफ च्या देवदूतांनी प्राणांची बाजी लावून तालुक्यातील नागरिकांचे प्राण वाचवले आहेत त्याविषयी सर्व पूरग्रस्तांनी कृतज्ञता व्यक्त केली असून आमदार सुरेश धस यांनी या देवदूतांचे आभार मानले रविवारी रात्री सोमवारी पहाटे झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतातील पीके वाहुन गेली शेतजमिनी खरडून गेल्या तसेच अनेक नागरिक पुरामध्ये अडकले.

नद्यांची पाण्याची पातळी एवढी वाढली की पूर परिस्थिती निर्माण झाली नदीकाठची लोक पुरा मध्ये अडकली गेली त्यांना वाचवण्यासाठी हेलिकॉप्टर द्वारे एअरलिफ्टिंगच्या पर्यायाशिवाय कोणताही पर्याय नसल्यामुळे आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याशी फोनवर संवाद करून या सर्व पूर परिस्थितीचा आढावा दिला. मग शासन स्तरावर मोठ्या वेगाने हालचाली झाल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा मदत पुनर्वसन मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी देखील संपर्क करून आमदार सुरेश धस यांनी अहिल्यानगर येथील आर्मी व एन डी आर एफ च्या टीम ने त्यांना हेलिकॉप्टर साह्याने पुरामध्ये अडकलेल्या लोकांना आपल्या हेलिकॉप्टरच्या द्वारे सुखरूप बाहेर काढण्यात यशस्वी झाले अशा भयानक परिस्थितीमध्ये शासन दरबारी व महाराष्ट्र सरकारकडे मोठ्या जलद गतीने पाठपुरावा केल्याने आर्मी एनडीआरएफ ची टीम व त्या टीम मधील आर्मीचे व इंडियाच्या जवानांनी मोठ्या हिमतीने अडकलेल्या जवळपास शेकडो लोकांचे प्राण वाचवण्याचे काम या अहिल्यानगर आर्मीतील जवान एन डी आर एफ जवान यांनी काम केल्याने हेलिकॉप्टर च्या द्वारे ज्यावेळी या लोकांना आपल्यासमोर मृत्यू दिसत होता. त्या मृत्यूच्या गुहेतुन बाहेर काढून आपल्या कुटुंबात आणले त्यावेळी त्यांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्यापाशी आपली भावना व्यक्त करताना त्यांचे अश्रू अनावर झाले व ते म्हणाले अण्णा तुम्ही आमच्यासाठी खरंच देवदूत बनून आलात आमदार सुरेश अण्णांचे आर्मीच्या जवानांचे देखील त्यांनी हात जोडून आभार मानले. आष्टी तालुक्यामध्ये या झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात शेतीचे शेत पिकाचे घरी पडली, कुणाचे शेत वाहून गेले ,तर कोणाच्या दुकानात पाणी शिरल्याने त्याचे लाखोचे नुकसान झाले शेतकरी शेतपिके वाहून गेल्याने हवानदील झाला आहे. अशा या परिस्थितीमध्ये तातडीने सर्व ठिकाणचे पंचनामे करण्याची उप जिल्हाधिकारी तहसीलदार यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठका घेऊन आमदार सुरेश धस यांनी सूचना करून लवकरात लवकर सर्व नुकसान ग्रस्तांचे पंचनामे करून जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करा अशा सूचना दिल्या आहेत

# पत्नीचा खून करणाऱ्या पतीस जन्मठेपेची शिक्षा

जालना। प्रतिनिधी

बदनापूर पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा क्रूरपणे खून करणाऱ्या पतीस जालना जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. तसेच दहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक वर्ष अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या निकालामुळे जिल्ह्यात सर्वत्र कायदा व न्याय व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.हा ऐतिहासिक निकाल मा. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश सौ. व्ही. एम. मोहिते यांनी सुनावला. आरोपीचे नाव किशोर कचरू नावकर (वय ३८, रा. ढासला, ता. बदनापूर, जि. जालना) असे आहे.

घटनेचा थरारक तपशील. आरोपी किशोर नावकर याने पत्नी कविता हिच्या चारित्र्यावर संशय घेत तिचा निर्घृण खून केला. कविता माहेर कंडारी खुर्द येथून आपल्या गावी ढासला येथे जात असताना कंडारी ते मालेवाडी मार्गावर गट क्र. ४०४ मधील शेतजमिनीजवळ आरोपीने मोठा दगड उचलून पत्नीच्या डोक्यावर व शरीरावर वार केले. यात कविताचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर फिर्यादी कारभारी लिंबाजी सोनवणे यांच्या तक्रारीवरून बदनापूर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ३७७/२०२४ नोंदविण्यात आला होता. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक डी. आर. चौरे यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल केले. साक्षीपुराव्याने मिळाली शिक्षा सरकारपक्षाने या खटल्यात ७ महत्त्वाचे साक्षीदार न्यायालयापुढे तपासले. यात प्रत्यक्षदर्शी विठ्ठल गणपत राठोड, पंच साक्षीदार, डॉक्टर प्रगीत व डॉ. संजय गोरे तसेच तपासी अधिकारी यांची साक्ष निर्णायक ठरली. पोलिस निरीक्षक श्री. सुदाम भागवत व तत्कालीन निरीक्षक मच्छिंद्र सुरवसे यांचे सहकार्य विशेष महत्त्वाचे ठरले. सरकारपक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता ॲड. अशोक डी. मते यांनी प्रभावीपणे युक्तिवाद मांडला.

# ना. पंकजाताई मुंडे यांनी वांगदरीत जाऊन केले भरत कराड यांच्या कुटुंबियांचे सांत्वन



लातूर। प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी ओबीसी आरक्षण धोक्यात असल्याच्या निराशेपोटी आत्महत्या केलेल्या भरत महादेव कराड यांच्या कुटुंबाची आज वांगदरी येथे जाऊन भेट घेतली. दुःखाचा डोंगर कोसळलेल्या कराड कुटुंबीयांच सांत्वन करत पंकजाताई मुंडे यांनी त्यांना धीर दिला. ओबीसी आरक्षण धोक्यात असल्याच्या निराशेपोटी भरत महादेव कराड यांनी काही दिवसापूर्वी मांजरा नदीत उडी मारून आत्महत्या केली होती. दरम्यान भरत यांच्या आत्महत्येनंतर ग्रामस्थांनी उपोषण सुरू केलेले उपोषण पंकजाताईंच्या भेटीनंतर मागे घेण्यात आले.

यावेळी माध्यमाशी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आपल्या लेकरांचं ओबीसी आरक्षण जाणार या नैराश्यातून भरतने आत्महत्या केली, ही खूप वाईट घटना आहे. आज मी त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली त्याच्या मुलाना कुरवाळलं, त्याच्या पत्नीला धीर दिला. लोकनेते मुंडे साहेब नेहमी म्हणायचे मदत करताना या हाताचं त्या हाताला सांगायचं नाही.

म्हणून कराड कुटुंबाला काय देणार, हे सांगणार नाही. मात्र मी या कुटुंबाच्या पाठीशी खंबीर उभी आहे. मी या विषयी विधिमंडळात प्रश्न उपस्थित करणार आहे. इतराना मदत केली तीच मदत कराड कुटुंबीयांना देखील देण्यात यावी, अशी मागणी देखील करण्यार असल्याचे पंकजा मुंडे यांनी सांगितलं.

# पत्रकार पांडुरंग शेजुळ हल्ला प्रकरण आरोपी मोकाट?

परतुर। प्रतिनिधी

तालुक्यातील आनंदवाडी येथील पत्रकार पांडुरंग शेजुळ यांच्यासह त्यांच्या पत्नीवर वरफळ (वाडी) येथील दोघे आणि आनंदवाडी येथील एका वाळुमाफियांनी हल्लाकरून गंभीर जखमी केल्याची घटना दि.७ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली होती, हा हल्ला करून आरोपी फरार झाले होते, त्याच दरमयान शेजुळ यांच्या फिर्यादीवरून परतुर पोलीस ठाण्यात दि.९ सप्टेंबर रोजी प्रशांत कदम, पवार व शिंदे नामक व्यक्तींवर ॲट्रासिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता, हा गुन्हा दाखल होऊन तब्बल दहा दिवसांचा कालावधी उलटला तरी देखील पोलिसांनी हे आरोपी सापडत नसल्यामुळे पोलिसांच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, परतुर तालुक्यातील आनंदवाडी येथील रहिवाशी असलेले पांडुरंग शेजुळ हे गावातील एका किराणादुकानावर खरेदीसाठी आपल्या पत्नीसमवेत आले होते, याचवेळी वाळुमाफियांनी तेथे येऊन आमच्या अवैध वाळुच्या विरोधात बातमया का लावतोस महणत मारहाण करण्यास सुरूवात केली, त्याचवेळी शेजुळ यांच्यासोबत असलेल्या त्यांच्या पत्नी ह्या भांडणे सोडविण्यासाठी आल्या असता त्यांनादेखील यावेळी वाळुमाफियांकडून मारहाण करून गंभीर जखमी करण्यात आले होते, त्यामुळे शेजुळ यांच्याफिर्यादीवरून वाळुमाफियांविरोधात परतुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता, परंतु गुन्हा दाखल होऊन अद्याप १० दिवसांचा कालावधी लोटला तरी पोलिसांनी आरोपी लवकरात लवकर अटक करण्याची मागणी करण्यात येत असुन येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये आरोपींना अटक न झाल्यास पत्रकार संघांच्या वतीने जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालय समोर आंदोलन उभे करणार असल्याचा इशारा एका प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

# अवकाळी पावसामुळे कोट्यवधींचे; जालना आपत्तीग्रस्त क्षेत्र घोषित करा-भास्कर दानवे

जालना। प्रतिनिधी

जालना तालुक्यात सततच्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांत पाणी साचून नागरिकांच्या घरात पाणी घुसले, तर व्यापार, व्यवसाय व शेती क्षेत्रालाही मोठा फटका बसला आहे. शहरातील बाजारपेठा, दूकाने, घरगुती साहित्य, शेतीमाल व वाहने यांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानाची दि.१८ सप्टेंबर रोजी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी लक्कडकोट परिसर, हनुमानघाट, खांडसरी परिसर, संटमेरी शाळेमागील परिसर, इदगाह रोड परिसर या सह शहरातील अनेक भागात पाहणी केली.



या परिस्थितीची गंभीर दखल घेत भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस व महसूलमंत्री मा.ना.श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्राद्वारे तात्काळ पंचनामे करण्यासाठी संबंधितास आदेश देण्याची मागणी केली व तहसीलदार, जालना व आयुक्त, जालना महानगरपालिका व प्रशासनाला तातडीने नुकसानग्रस्तांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले.यावेळी त्यांनी म्हटले की, ''शहरातील सर्वसामान्य नागरिक, व्यापारी व शेतकरीवर्ग मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांच्या नुकसानीकडे दुर्लक्ष होऊ नये. प्रशासनाने युद्धपातळीवर मदतकार्य राबवून तातडीने आर्थिक सहाय्य द्यावे.'' भास्कर आबा दानवे यांनी पुढे सांगितले की, शासनाकडून मदत येईपर्यंत महापालिका व जिल्हा प्रशासनाने स्थानिक स्तरावर तत्काळ उपाययोजना कराव्यात.

पूरग्रस्त भागांत रोगराई पसरू नाही म्हणून आरोग्य पथके तैनात करावीत, पिण्याच्या पाण्याची सोय करावी तसेच वीजपुरवठा खंडित झालेल्या भागात तत्काळ व्यवस्था करावी. पाणी घरात शिरल्यामुळे नागरिकांची भीषण अवस्था झाली.

लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. काही ठिकाणी भिंती कोसळल्याच्या घटना तर काही ठिकाणी झाडे उपटून पडल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला आहे.

# घरकुल लाभार्थ्याकडून पैशाची मागणी करणारे अभियंताची हकलपट्टी करा?

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी पंचायत समिती अंतर्गत व तसेच जिल्हा परिषद बांधकाम अंतर्गत इंजिनीयर अभियंता स्थानिक घनसावंगी तालुक्यातील असल्यामुळे घरकुल लाभार्थ्याकडून पैशाची मागणी करीत आहे करता सदरील अभियंताची तत्काळ बदली करा असे मागणी करण्यात येत आहे. सर्व विभागामार्फत सर्व अभियंता हे स्थानिकचे असल्यामुळे ते मनमानी कारभार करत आहेत, त्यांची दुसऱ्या तालुक्यामध्ये बदली करून इतर तालुक्यातील अभियंत्यांची नियुक्ती घनसावंगी प.स. पेथे करण्यात यावी, नसता आम्ही आमरण उपोषण करणार आहे.

याप्रकरणी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्काळ लक्ष देऊन बदली करावे अशी मागणी करण्यात आली आहे . घरकुल पैसे टाकण्यासाठी अभियंते हे स्थानिक घनसावंगी तालुक्यातील असल्यामुळे प्रत्येक लाभार्थ्यांवर पैशासाठी दबाव टाकतात आमचे वडील, नातेवाईक हे कार्यकर्ते आहेत त्यामुळे आमचे कोणीच काही करू शकत नाही अशा पद्धतीने गोरगरीब लाभधारकांवर दबाव टाकतात रूबाब करतात जे लाभार्थी पैसे देतात त्यांची घरकुल न बांधता पैसे टाकतात आणि गरीब वंचित लाभधारक मात्र घर बाधूनही सुद्धा लाभ मिळत नाही. परकुल बांधण्यासाठी अनेक संकटाना तोंड द्यावे लागते व्याजाने पैसे काढून घर बांधकाम करतात आणि सदरील अभियंते हे पैशाची वाट पाहतात. त्यामुळे घरकुल लाभधारकांवर आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. असे निवेदन जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी जालना, प्रकल्प अधिकारी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जालना तसेच गटविकास अधिकारी पंचायत समिती घनसावंगी यांना देण्यात आली आहे. या निवेदनावर डी पी आय पार्टीचे जिल्हाध्यक्ष गणेश लोंढे,लखन लोंढे, पिराजी सोनवणे, अमोल हिवाळे यांच्या स्वाक्षरी आहे.

cmyk

# शासनाच्या चुकीच्या निर्णयाविरोधात आयएमएचे तीव्र आंदोलन

## शासनाचे परिपत्रक कायदा विरोधी व न्यायालयाचा अवमान करणारे -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) च्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, या निर्णयाचा भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) महाराष्ट्र राज्याने तीव्र विरोध दर्शविला असून गुरूवार, दिनांक १८ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय संप पुकारण्यात आला होता. या संपामुळे अंबाजोगाईसह संपूर्ण महाराष्ट्रात रूग्णसेवा विस्कळीत झाली होती.

यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई तर्फे आयएमएचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.विजय लाड, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.एस.यु.पाटील, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.राहुल धाकडेंसह मार्ड संघटनेचे डॉ.निखिल सातपुते, इनर व्हिल क्लबचे प्रा.सुरेखा सिरसाट, प्रा.चंद्रकला देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संघटनेची भूमिका मांडताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले की, बीएचएस डॉक्टर्स आधीच महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलमध्ये नोंदणीकृत आहेत. शासनाने घेतलेला हा निर्णय ११ जुलै २०२४ रोजीच्या स्वतःच्या परिपत्रकाच्या विरोधात असून, यासंदर्भातील खटला माननीय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना काढलेले हे परिपत्रक कायद्याला धरून नसलेले व




न्यायालयाचा अवमान करणारे आहे. होमिओपॅथी आपल्या जागी श्रेष्ठ आहे. परंतु, त्या डॉक्टर्सनि आमची नांवनोंदणी ॲलोपॅथीच्या नोंदणी पुस्तकात करावी ही मागणी अनाकलनीय आहे. होमिओपॅथीचा अभ्यासक्रम पूर्णपणे वेगळा असून त्या पॅथीचे तत्व, उपचार पद्धती संपूर्ण वेगळ्या आहेत. होमिओपॅथी ॲलोपॅथी मध्ये मिक्स करण्याचं सरकारी मिक्स पॅथीचे धोरण हे सर्वसामान्य जनतेच्या प्राणाशी खेळण्याचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे रूग्णांच्या सुरक्षिततेवर गंभीर धोका निर्माण होईल, आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा तसेच व्यवसायाचा दर्जा घसरेल. तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी) आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कायद्याचे उल्लंघन होईल, अशी भूमिका डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी मांडली. तर अपुरे प्रशिक्षण घेतलेले डॉक्टरांकडून रूग्णांवर उपचार म्हणजे थेट त्यांच्या जीवाशी खेळ असल्याची भीतीही डॉ.नवनाथ घुगे यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे. तर यासंदर्भात गुरुवारी १८ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभरातील सर्व डॉक्टर एक दिवसाचा संप केला ज्यामध्ये आपत्कालीन सेवाही पूर्णपणे बंद होत्या अशी माहिती आय.एम.ए महाराष्ट्र यांनी दिली आहे. तसेच शासनाने हा निर्णय मागे घेतला नाही तर पुढील आठवड्यात मुंबईतील आझाद मैदानावर भव्य मोर्चा आणि बेमुदत उपोषण छेडण्याचा इशाराही आयएमएने दिला आहे. यावेळी या सरकारी निर्णयाचा निषेध करणारे निवेदन माननीय उपजिल्हाधिकारी यांना आयएमएच्या पदाधिकाऱ्यांनी दिले. या निषेध मोर्चात राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले स्थानिक अध्यक्ष डॉ नवनाथ घुगे, उपाध्यक्ष डॉ.विजय लाड, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.सोपानराव पाटील, डॉ दिलीप खेडगीकर, डॉ.निलेश तोष्णीवाल, डॉ.राहुल धाकडे, डॉ.दीपक पाटील, डॉ.संदीप थोरात, डॉ.अनिल भुतडा, डॉ.अतुल शिंदे, मार्ड संघटनेचे अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.निखिल सातपुते, उपाध्यक्ष डॉ.संतोष चांदणे, सचिव डॉ.आशुतोष बावचे, प्रवक्त्या डॉ.स्नेहा निकम, महिला प्रतिनिधी डॉ.आयुष साबू, इनरहिल क्लबच्या सुरेखा शिरसाट, प्रा.चंद्रकला देशमुख यांच्यासह अनेक डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी सर्व डॉक्टर्संनी दिलेल्या घोषणांमुळे परिसर दुमदुमला होता.

# वैष्णोदेवी मंदिरात महादेव महाराज चाकरवाडीकर व एस. पी. नवनीत कॉवत यांच्या हस्ते होणार घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

येथील विप्रनगर ब्राह्मणवाडी भागातील वैष्णोदेवी मंदिर संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नवरात्र महोत्सव आयोजित होणार असुन त्याची तयारी जवळपास पूर्ण झालेली आहे. बीड शहराचे भुषण असणारे व महाराष्ट्रातील एकमेव असणारे वैष्णोदेवी मंदिर भक्तांचे श्रद्धास्थान आहे. प्रत्यक्ष वैष्णोदेवी मंदिर प्रमाणे हुबेहुब असणारे हे मंदिर जागृत देवस्थान म्हणुन प्रसिद्ध आहे.



दरवर्षी नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम संस्थान तर्फे आयोजित करण्यात येतात याही वर्षी ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर व बीड जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमान नवनीतजी कॉवत साहेब यांच्या शुभहस्ते घटस्थापना होणार आहे. तसेच सप्तमीला तीन दिवसीय नवचंडी याग, नवदुर्गा पुजन व नवमीला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या सर्व कार्यक्रमास भक्तजणांनी उपस्थित राहावे असे आव्हान संस्थापक अध्यक्ष श्री संतोष सोहनी यांनी केले आहे. नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभुमीवर मंदिराची डागडुजी, कलर काम, विद्युत रोषनाई, मंडप आदि कामे पुर्ण झाली असुन दरवर्षी प्रमाणे याही वर्षी नवरात्र उत्सव मोठ्या जल्लोशात साजरा करण्यात येणार आहे. ◀◀ पान २ वर

# खड्ड्यांनी घेतला चिमुरडीचा जीव

## रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वेळेत उपचार न मिळाल्याने सर्पदंशग्रस्त मुलीचा मृत्यू

धारुर । प्रतिनिधी

पहाडी दहिफळ येथील सर्पदंश झालेल्या एका अल्पवयीन मुलीचा उपचाराअभावी दुर्दैवी मृत्यू झाला. वेळेत दवाखान्यात पोहोचले असते तर तिचा जीव वाचला असता, मात्र वडवणी-थेटेगव्हाण हा रस्ता इतका खड्डेमय झाला आहे की प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देणे ठरत आहे. हा रस्ता इतका खड्डेमय आणि मोडकळीस आलेला आहे



की रुग्णवाहिकेने पोहोचणे म्हणजे जणू खडतर डोंगर चढण्यासारखे ठरते. शेवटी तो विलंब जीवघेणा ठरला आणि एका कोवळ्या जिवाला अकाली मरणाला सामोरं जावं लागलं.

धारुर तालुक्यातील पहाडी दहिफळ येथील कु.ज्ञानेश्वरी हरिभाऊ नागरगोजे वय(७वर्षे)या मुलीला दि.१६ सप्टेंबर मंगळवार रोजी रात्री उलटी होऊ लागल्याने तिला उपचारासाठी वडवणी येथे घेऊन येत असताना वडवणी जवळील रेल्वे पुलाखाली मोठ्या प्रमाणात पाणी असल्याने गाडी जाणे शक्य नव्हती म्हणून परत वडवणी-थेटेगव्हाण मार्गे बीडला घेऊन जात असताना खड्डेमय रस्त्यामुळे उशीर झाल्याने या मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाला.

लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याचे ◀◀ पान २ वर

# ओबीसी नेत्या डॉ. स्नेहाताई सोनकाटे यांचा बीड येथे सत्कार

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी लढा देणाऱ्या समता परिषद महाराष्ट्र राज्याच्या सरचिटणीस आणि ओबीसी समाजाच्या प्रखर नेत्या डॉ. स्नेहाताई सोनकाटे यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहात ओबीसी समाज बांधवांची भेट घेतली. या प्रसंगी त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करून समाजातील एकतेचे आणि संघटित होण्याचे महत्त्व पटवून दिले.



डॉ. सोनकाटे म्हणाल्या की, "ओबीसी समाज आज संख्या बलात मोठा असूनही संघटित नसल्यामुळे आपले अनेक प्रश्न प्रलंबित राहतात. शासन आणि प्रशासनाकडे आपल्या मागण्या पोहचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी सजग, संघटित आणि संघर्षशील राहण्याची ◀◀ पान २ वर

# पीक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ पिकांचा पंचनामा करावा - भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

जिल्ह्यात दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे सर्व नद्यांना पुर आला असून शेतात पाणी साचले आहे. या परिस्थितीमुळे उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पीक विमा कंपनीने तात्काळ शेतात जाऊन पंचनामा करावा व योग्य मोबदला द्यावा, अशी मागणी शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केली आहे.



शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे म्हणाले की, दरवर्षी परतीच्या पावसाने जिल्ह्यात पिकांचे नुकसान होत आहे; मात्र, पीक विमा कंपनीचे अधिकारी नेहमीच उशीरा येऊन पंचनाम्याची प्रक्रिया करतात. मात्र यंदा जिल्ह्यात जोरदार ढगफुटी आणि अतिवृष्टी झाली असून, नद्यांना पुर आला आहे. ◀◀ पान २ वर

# ना. छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत बीडमध्ये ओबीसींचा महाएल्गार मेळावा

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, राज्याचे कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळावा रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी दिली आहे.



हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला असून यामुळे ओबीसी समाजामध्ये कमालीची भीती आणि सरकार विरोधात प्रचंड असंतोष पसरला आहे. मराठा समाज बांधवांना आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने या निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय? या भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरिक ◀◀ पान २ वर

# एस.पी. नवनीत कॉंवत यांनी घडविले माणुसकीचे दर्शन

## पोलीस कुटुंबीयांच्या बाळांसाठी पोलिस अधीक्षक जिल्हा रुग्णालयात दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दैनंदिन व्यस्त कामातून वेळ काढून अंगरक्षक असलेल्या राऊत यांच्या पत्नीची मुदतपूर्व प्रसुती झाली. बाळांना अतिदक्षता एनआयसीयु दाखल करण्यात आले.

पोलिस अधीक्षक नवनीत कॉंवत यांचा शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी वाढदिवस होता. अधिकारी, कर्मचारी आणि अन्य मान्यवरांनी शुभेच्छा देण्यासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयात आले




होते. एस पी नवनाथ कवा त्यांना आपले अंगरक्षक पोलीस राऊत कुटुंबीयांची मदतपूर्व प्रसूती झाल्याचे समजले. त्यांनी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या समवेत बाकी कामे बाजूला जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक शहाणे, समन्वयक डॉ. हनुमंत पारखे व तज्ञ डॉक्टरांची भेट घेतली. अंगरक्षक पोलिस कर्मचारी राऊत यांच्या बाळ आणि बाळाच्या आईच्या आरोग्याची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणून मोठा व्याप आणि व्यस्त दिनचर्या असताना नवनीत कॉवत यांनी या भेटीतून आपल्यातील माणुसकी व सहृदयतेचे दर्शन घडवले. बीड येथे रुजू झाल्यापासून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ◀◀ पान २ वर

# श्री योगेश्वरी मल्टिस्टेट ही गरजवंतांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सदैव कटिबद्ध - अध्यक्ष सोळंकी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचा सन २०२४-२५ या वर्षाची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संस्थेचे सर्व सभासद, ग्राहक,ठेवीदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. याप्रसंगी त्यांनी श्री




योगेश्वरी मल्टिस्टेट ही संस्था गरजवंतांच्या तसेच निराधारांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे आवर्जून उल्लेखित केले. संस्थेचा सन २०२४-२०२५ चा १२ वा वार्षिक अहवाल सादर करतांना मार्च २०२४ अखेर रुपये ९९ लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती सांगत सभासदांना १०% लाभांश जाहीर केला. अध्यक्ष रिकबचंद सोळंकी हे संस्थेचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचा अहवाल सादर करताना बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांच्यासह संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक उपस्थित होते. संस्थेचा १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्वप्रथम शहराचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आर्थिक वर्षात निधन झालेल्या संस्थेच्या ग्राहक व हितचिंतकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. ◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाची तातडीची मदत हाच एकमेव आधार - आ.संदीप क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीड मतदार संघातील अनेक भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांनी नुकसान झालेल्या भागात जाऊन नुकसानीची पाहणी केली.

मागील काही दिवसांपासून बीड आणि शिरूर (का) सातत्याने पाऊस पडत असून अनेक महसूली मंडळात अतिवृष्टी झाली आहे. त्यापैकी चौसाळा जिल्हा परिषद गट, मांजरसुंबा पं.स.गण, लिंबागणेश पं.स.गण याठिकाणच्या गावातील झालेल्या शेतकरी बांधवांच्या पीक नुकसानीचे, सार्वजनिक मालमत्तेचे व इतर ठिकाणचे बीड विधानसभेचे आ. संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी बीड आणि



शिरूर का तालुक्यातील सर्व महसूल मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी देखील आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

बीड विधानसभा मतदारसंघात चौसाळा येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन चे पिक अक्षरशः पाण्यात गेले आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले. आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदार संघातील पिंपळगाव घाट येथील तेलपवस्ती नुकसान पाहणी केली. याठिकाणी बंधारा फुटल्याने शेतातील माती वाहून गेली आहे. शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच साखरे बोरगाव येथील पुल ढासळला आहे. मोरगाव अंतर्गत जाधव वस्ती, लिंबागणेश मधील बोरखेड रस्त्यावरील वाणी वस्ती वरील रस्त्याचा पूल वाहून गेला आहे. त्याठिकाणी देखील पाहणी करून नुकसान पाहणी वेळी प्रत्यक्ष प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना कसलाही विलंब न लावता सरसकट आर्थिक मदत द्यावी. शेतकरी बांधवांना न्याय मिळेपर्यंत प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

# शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या - गणेश बजगुडे



बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यासह जिल्हाभरात परतीच्या पावसाने प्रचंड धुमाकुळ घातलेला असुन शेतमालासह शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अतिशय कष्टाने उभारलेली खरिपाची सर्वच्या सर्व पिके तर गेलीच परंतु माती देखील मोठ्या प्रमाणात वाहुन गेल्यामुळे शेतमालासह शेतीचे देखील मोठे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्याच्या पिकाला हमी भाव नाही, कर्जमाफी नाही, पिक विमा देखील मिळत नाही यामुळे आधीच हवालदिल असलेला शेतकरी पुन्हा अतिवृष्टीमुळे हातातोंडाला आलेले पीक वाहुन गेले यामुळे शेतकरी बांधव प्रचंड त्रस्त असुन बीड तालुक्यातील सर्वच्या सर्व मंडळात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालेले असताना प्रशासन आणि शासन पंचनाम्याच्या नावावर वेळ काढूपण! करत असुन मायबाप सरकारने पंचनाम्याचे गुऱ्हाळ बंद करून सर्व शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट हेक्टरी किमान ५० हजार नुकसान भरपाई द्यावी जर आठ दिवसाच्या आत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाही मिळाली तर बीड तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे बीड तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी तहसीलदार बीड यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे यानिवेदनावर गणेश राऊत, रामधन जमाले, ॲड. अक्षय मुळे, शिवराज क्षीरसट, अविनाश डरपे, आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचे काम महिन्याभरात पूर्ण होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने बोऱ्हाडेवाडी, मोशी येथे ४० फूट उंच चौथाऱ्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा १०० फूट उंचीचा कांस्य धातूचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात येत आहे. हे काम वेगात सुरू असून ऑक्टोबरपर्यंत काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.



छत्रपती संभाजी महाराजांचा १०० फूट उंचीचा कांस्य धातूचा पुतळ्यासाठी ३२ कोटी ८४ लाख रूपये खर्च झाला आहे. प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांच्या दिल्ली येथील फॅक्टरीत तयार केलेला संभाजी महाराज पुतळ्याचे कांस्य धातूचे सुटे भाग उभारणीच्या ठिकाणी आणून प्रत्यक्ष पुतळा उभा केला जात आहे. आत्तापर्यंत पुतळ्याच्या जिरेटोपासह तलवार अन्य असे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. पुतळ्याला पॉलिसींग व कोटींग करून रंग दिला जात आहे. पुतळ्यासाठी १५ कोटी खर्च करून ४० फूट उंचीच्या चौथरा बांधण्यात आला आहे. यामध्ये पुतळ्याच्या चौथर्याचे जीएफआरसी कॉंक्रीटऐवजी दगडी बांधकाम करण्यात येणार आहे. त्यासाठी ५ कोटी ४१ लाख २७ हजार रूपयांचा वाढीव खर्च केला जाणार आहे. पीएमआरडीएच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रात छत्रपती संभाजी महाराज व सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचा पुतळा उभारण्यात येणार आहे. त्यासाठी पीएमआरडीएने २.५ एकर जागा महापालिकेच्या ताब्यात दिली आहे. ते काम धनेश्वर कन्स्ट्रक्शनमार्फत सुरू आहे.

पुतळ्याभोवती मावळे व सैनिकांचे पुतळे असणार आहेत. पुतळाभोवती उंच ध्वजस्तंभ उभारण्यात येणार आहे. आकर्षक ध्वनी व विद्युत प्रकाश व्यवस्था केली जाणार आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील मुख्य प्रसंगांवर आधारित म्युरल्स उभारले जाणार आहेत. संभाजी महाराज यांच्या जीवनावरील तसेच, ऐतिहासिक साहित्य व शस्त्रांचे एक संग्रहालय बांधण्यात येणार आहे. परिसराचे सुशोभिकरण करून उद्यानही विकसित केले जाणार आहे. ॲम्पी थिएटर, सुशोभिकरण, विद्युत रोषणाई, प्रेक्षक गॅलरी, स्वच्छतागृह, नवीन तंत्रज्ञानावर आधारित कलाकृती साकारण्यात येणार आहेत. सुबक कलाकसुरीची सजावटही केली जाणार आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सुमारे २० ते २५ कोटींची निविदा असण्याची शक्यता आहे.

### छत्रपती संभाजी महाराजांचा जीवनपट

स्मारकाच्या परिसरात ऑगमेंटेड रिॲलिटी (एआर) आणि व्हॅर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) या अत्याधुनिक आभासी तंत्रज्ञानाच्या वापर करून छत्रपत्री संभाजी महाराज यांच्या जीवनपट उलगडण्यात येणार आहे. संभाजी महाराज यांच्या आयुष्यातील विविध ऐतिहासिक घटना, त्यांचे बुद्धीकौशल्य, मृत्यूपूर्व जीवन संघर्ष, वस्त्रप्रावरण, त्यांची धर्मनिष्ठा, मुघलाविरुद्ध लढाई, त्याक आदी बाबींचा अधिक जिवंतपणे अनुभव घेण्यासाठी एसआर व व्हीआर तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. ते काम लेमन डिजाईन प्रा. लि. एजन्सी करणार आहे.

# शिरूरचा रोहित जासूद आंतरराष्ट्रीय रंगमंचावर; पहिल्याच चित्रपटात प्रमुख भूमिकेत

**शिरूर | प्रतिनिधी**

**शिरूर शहरातील मराठमोळा युवक रोहित जासूद याने अभिनयाच्या क्षेत्रात थेट आंतरराष्ट्रीय झेप घेतली आहे. त्याचा पहिलाच चित्रपट जगातील नामांकित स्वतंत्र चित्रपट महोत्सवांपैकी एक असलेल्या 'चेलसी फिल्म फेस्टिवल'**





**(उहशश्रीशर ऋळश्रा ऋशीींर्ळींरश्र) साठी नामांकित झाला असून हा चित्रपट येत्या १८ ऑक्टोबरला न्यू यॉर्कमध्ये प्रदर्शित होणार आहे.**

या चित्रपटात रोहितने प्रमुख भूमिका साकारली असून त्याच्या नैसर्गिक आणि संवेदनशील अभिनयाची दखल समीक्षक व आंतरराष्ट्रीय प्रेक्षक घेत आहेत. मेहनत व चिकाटीच्या बळावर त्याने चित्रपटाला नवा चेहरा दिला आहे. पहिल्याच प्रयत्नात मिळालेल्या या मोठ्या यशामुळे रोहितच्या पुढील वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पहिल्या चित्रपटानंतर रोहितने न्यू यॉर्कमध्ये आणखी एका चित्रपटात प्रमुख भूमिका निभावत दिग्दर्शनाची धुरा स्वतः हाती घेतली आहे. या चित्रपटाचे पोस्ट-प्रोडक्शन काम अंतिम टप्प्यात असून लवकरच तो विविध आंतरराष्ट्रीय फेस्टिवल्समध्ये झळकणार आहे. कोरोना काळात मुंबईत बिझनेस मॅनेजमेंटचे शिक्षण घेत असताना रोहितला अभिनयाची तीव्र ओढ जाणवली.

धाडस करून त्याने पालकांसमोर आपले स्वप्न मांडले, मला न्यू यॉर्कला जाऊन अभिनय शिकायचा आहे! आणि आई-वडिलांनी त्याला पूर्ण पाठिंबा दिला. त्या प्रेरणेनेच तो न्यू यॉर्कला गेला आणि तेथून त्याच्या अभिनय प्रवासाला सुरुवात झाली. मी कलाकार म्हणून अजून कसून काम करणार आहे.एक दिवस मराठी मुलगा जगाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचलेला पाहायचा आहे, अशी ठाम भावना रोहित व्यक्त करतो. त्याला कायम प्रोत्साहन व मार्गदर्शन देणारे वडील उद्योजक बाबासाहेब जासूद व आई ड. हेमा जासूद यांच्या पाठबळामुळे त्याने आपले स्वप्न सत्यात उतरवले.रोहितच्या या यशामुळे शिरूर परिसरात आनंदाचे वातावरण असून, पहिल्याच चित्रपटात आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रमुख भूमिका साकारून नावाजला जाणारा रोहित हा आजच्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# महात्मा फुले विद्यालयातील गुरुजनांचे माजी विद्यार्थ्यांकडून गुरुपूजन

**इंदापूर | प्रतिनिधी**

**इंदापूर तालुक्यातील मौजे वरकुटे खुर्द येथिल वरकुटे खुर्द ग्रामविकास प्रतिष्ठान संचलित महात्मा फुले विद्यालयात सन २००२ दहावीची बॅच यांच्या वतीने शनिवार (दि.१३ रोजी) विद्यालयात माजी विद्यार्थी स्नेह मेळावा आयोजित केला होता.**



त्यानिमित्त संस्थेचे संस्थापक अँड.कृष्णाजी यादव,सर्व गुरुजन व शिक्षकेतर कर्मचारी यांचे गुरुपूजन करून विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती सन्मानपूर्वक देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.वरकुटे खुर्द गावातील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन शैक्षणिक संकुल उभे केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अँड.कृष्णाजी यादव यांना माजी विद्यार्थ्यांकडून सन्मानपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अँड. कृष्णाजी यादव होते.त्यांनी आपल्या भाषणामध्ये कार्यक्रमाच्या नियोजनाबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्याचबरोबर आपल्या सुखदुःखात सर्वात जवळची व्यक्ती म्हणजे मित्र असतो. आपण २३ वर्षानंतर एकत्र येत आहात याच्यातूनच तुमची सर्वांची मैत्री अधिक घट्ट आहे हे दिसून येते.या मैत्रीचा उपयोग एकमेकांच्या सहकार्यासाठी करा असेही त्यांनी सांगितले.

माजी विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल, गुरुजनांबद्दल आपले ऋण व्यक्त केले.जुन्या आठवणींना उजाळा देताना शाळेमध्ये केलेल्या चांगल्या गोष्टी त्याचबरोबर नजरचुकीने झालेल्या वाईट गोष्टी याही सांगितल्या.या विद्यालया मुळेच आमच्यावरती चांगले संस्कार झाले असेही सांगितले.या ठिकाणी घातल्या गेलेल्या संस्काराच्या पायामुळे आम्ही यशस्वी शिखरापर्यंत पोहोचू शकलो असेही काही विद्यार्थ्यांनी सांगितले. शिक्षकांनीही आपापली मनोगते व्यक्त केली. त्याचबरोबर विद्यालयाची गरज लक्षात घेऊन महात्मा फुले विद्यालयास माजी विद्यार्थ्यांकडून एक इन्व्हर्टरही भेट देण्यात आला.

यावेळी विद्यालय स्थापन झाल्यापासून ज्या ज्या शिक्षकांनी या विद्यालयात सेवा दिली त्या सर्व शिक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते. सेवानिवृत्त मुख्याध्यापक, सेवानिवृत्त शिक्षक यांचाही सन्मान करण्यात आला.

# अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी प्रशासनाने जबाबदारीने काम करावे -नारायण कुचे

**पिंपरी | प्रतिनिधी**

उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कटिबद्ध असून या घटकांचे सर्वांगीण कल्याण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून जाणिवपूर्वक प्रयत्न करावेत, असे निर्देश महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे प्रमुख नारायण कुचे यांनी दिले.

महाराष्ट्र विधानमंडळाची अनुसूचित जाती कल्याण समिती पुणे जिल्हा दौऱ्यावर आहे. आज या समितीची पिंपरी चिंचवड महापालिकेत बैठक पार पडली. यावेळी आमदार अमित गोरखे,भीमराव केराम, तानाजी मुटकुळे, शाम खोंडे, सचिन पाटील, गजानन लवटे, संजय मेश्राम, डॉ. प्रज्ञा सातव, जगन्नाथ अभ्यंकर यांच्यासह विधानमंडळ सचिवालयाचे सहसचिव सुभाष नलावडे, अवर सचिव सीमा तांबे, कक्ष अधिकारी राहुल लिंगरवार, समिती प्रमुख यांचे स्वीय सहाय्यक रणजित गमरे, सहाय्यक कक्ष अधिकारी संदीप माने, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, शहर




अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सह शहर अभियंता अनिल भालसाखळे, अजय सुर्यवंशी, देवन्ना गट्टुवार, माणिक चव्हाण, उपायुक्त सचिन पवार, सिताराम बहुरे, राजेश आगळे, संदीप खोत, ममता शिंदे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, किरणकुमार मोरे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त कीर्ती नलावडे, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे, पुणे जिल्हा परिषद समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांच्यासह कामगार नेते गणेश भोसले, तुकाराम गायकवाड, संजय जगदाळे, अविनाश ढमाले, परशुराम कदम, अविनाश इंगवले तसेच पिंपरी चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनातील समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद आदींचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीत महापालिकेतील अनुसूचित जातींच्या प्रवर्गातील कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कल्याणकारी योजनांबाबत समिती सदस्यांनी माहिती घेऊन त्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

# किरकोळ वादातून ज्येष्ठ रिक्षाचालकावर शस्त्राने वार; ३ जण पोलिसांच्या ताब्यात

**पुणे | प्रतिनिधी**





वादातून रिक्षाचालक ज्येष्ठावर तीक्ष्ण शस्त्राने वार करण्यात आल्याची घटना कात्रज भागातील आंबेगाव परिसरात घडली. या प्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी तिघांना अटक केली. राजू दत्तू जगताप ( ६२, रा. जयप्रकाशनगर, किरकटवाडी, सिंहगड रस्ता) असे गंभीर जखमी झालेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे.

जगताप यांच्या खुनाचा प्रयत्न केल्या प्रकरणी प्रसाद भारत निकाळजे ( १८), समीर इंद्रजीत थापा ( २८), यश विनोद निकाळजे ( २३, तिघे रा. खुळेवाडी, चंदननगर, नगर रस्ता) यांना अटक करण्यात आली. याबाबत जगताप यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जगताप आणि भारत निकाळजे हे नातेवाईक आहेत. आरोपी प्रसाद हा भारत निकाळजे यांचा मुलगा आहे. जगताप आणि निकाळजे यांच्यात कौटुंबिक वाद होता. १७ सप्टेंबर रोजी जगताप हे रात्री साडेदहाच्या सुमारास कात्रज-देहूरोड बाह्यवळण मार्गाने रिक्षातून निघाले होते.त्यावेळी आरोपी निकाळजे, थापा दुचाकीवरुन तेथे आले. आरोपी जगताप यांचा पाठलाग करत होते. आंबेगाव परिसरात आरोपींनी रिक्षाला दुचाकी आडवी घातली. जगताप यांना शिवीगाळ करुन त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. आरोपींनी केलेल्या हल्ल्यात जगताप गंभीर जखमी झाले.या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक आयुक्त राहुल आवारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या आरोपींना पोलिसांनी अटक केली. पोलीस उपनिरीक्षक निकम तपास करत आहेत.



# वाघोलीतील अतिक्रमणांवर हातोडा, मनपा व पीएमआरडीएची संयुक्त कारवाई

**वाघोली | प्रतिनिधी**

पुणे मनपा अतिक्रमण विभाग व पीएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने वाघोली मधील वाघोली केसनंद रोड, वाघोली आव्हाळवाडी, वाघोली बाईफ रोडवरील अतिक्रमणे पोलीस बंदोबस्तात काढण्यात आली.

वाघोली तालुका हवेली येथे प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली होती. काही महिन्यांपूर्वी पुणे नगर रस्त्यावरील अतिक्रमणे काढून वाघोली येथील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मोलाची कामगिरी प्रशासनाने केली होती.

वाघोली केसनंद रस्ता, वाघोली आव्हाळवाडी रस्ता, वाघोली बाईफ रस्ता या ठिकाणी मनपा प्रशासन व पीएमआरडीच्या वतीने पोलीस बंदोबस्तात अतिक्रमणे काढून रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी या अतिक्रमणे पुन्हा होऊ नये यासाठी प्रशासनाने योग्य ती दखल घ्यावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन आळंदी,पुणे येथे मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा - पांडुरंग आवारे

आळंदी देवाची( प्रतिनिधी) दि.१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आपणास व आपल्या परीवारास प्रथम खूप खूप शुभेच्छा...दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वतंत्र झाला परंतू हैदराबाद संस्थान म्हणजेच मराठवाडा हा तब्बल १३ महिन्या नंतर दि. १७ सप्टेंबर १९४८ साली मराठवाडा स्वतंत्र झाला म्हणूनच मराठवाड्यातील सर्व घटकातील समाज बांधव दि.१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन म्हणून मोठ्या आनंदात साजरा करत आहेत त्याच धर्तीवर आज आम्ही देहु फाटा आळंदी,पुणे येथे १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन ध्वजारोहण करत मोठ्या आनंद व उत्साहात साजरा करण्यात आला व मराठवाडा मुक्तीसंग्राम प्राणाची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले आणि मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त सर्व घटकातील समाज बांधवास शुभेच्छा देण्यात आल्या या प्रसंगी मराठवाड्यातील शिवसंग्राम संपर्कप्रमुख पिंपरी-चिंचवड शहर पुणे.मराठा सेवक श्री.पांडुरंग आवारे-पाटील,उद्योजक श्री.दादासाहेब जाधव,श्री.सुरेश नाना झोंबाडे,श्री.दत्तात्रय राठोड साहेब,श्री.सुनीलजी काकडे,श्री.संतोष हावडे,अँड महेश राजगुरू,श्री.अभिमान साबळे,श्री.कुलदीप जाधव,प्रा.श्रीकांत आचोले सर,श्री.श्रीकांत



काकडे,राजेंद्र श्री.गलधर,राहुल आवारे,वैभव नाईकवाडे,आदित्य चव्हाण,विष्णू गित्ते,संजय मुंडे, सज्जन शेळके, म्हेत्रे परमेश्वर, अन्य मान्यवर उपस्थितीत होते.

# बकोरी रस्त्यांच्याबाबत प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

**वाघोली | प्रतिनिधी**

बकोरी रोडच्या समस्येबाबत मागील पाच दिवसांपासून बकोरी फाटा येथे टीम वाकोच्या वतीने सुरू असलेले आमरण उपोषण आंदोलन सोडले. पीएमआरडीए व पीएमसीच्या वतीने मागण्यांचे लेखी उत्तर मिळाल्यानंतर उपोषणकर्ते अनिलकुमार मिश्रा यांनी बकोरी रोडवर अपघातग्रस्त झालेली वृद्ध व्यक्ती, पोलीस निरीक्षक युवराज हांडे व उपस्थितांच्या हस्ते ज्यूस पिऊन पाचव्या दिवशी सायंकाळी उशिरा उपोषण सोडले. यावेळी उपस्थित नागरिकांनी जल्लोष केला, फटाके उडवून व नाचून आनंद व्यक्त केला.

मागील अनेक वर्षांपासून बकोरी रोडवर प्रवास करीत असताना नागरिकांना कसरत करावी लागत आहे. प्रशासनाकडे नागरिकांनी, लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करूनही या रस्त्याचा प्रश्न लागत नाही. न्यायालयीन प्रक्रियेत अडकलेल्या या रस्त्यामुळे प्रशासन याकडे कानाडोळा करीत आहे. या रोडसंदर्भात टीम वाको च्यावतीने आमरण उपोषण आंदोलन १३ सप्टेंबर पासून सुरु करण्यात आले होते. अनिलकुमार मिश्रा यांनी उपोषणाला सुरुवात केल्यानंतर बकोरी रोडवरील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. उपोषणाच्या चौथ्या



दिवशी पीएमआरडीए आणि पीएमसीच्या अधिकाऱ्यांनी पाहणी केली. पीएमआरडीएच्या वतीने सदरचा रोड महापालिकेला हस्तांतरित करण्यात आला तर बिल्डरला रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत नोटीस काढण्यात आली. पीएमसीने दिलेल्या लेखी पत्रामध्ये दोन महिन्यात डीपीआर, निधी उपलब्ध तीन महिन्यात कामाला सुरुवात, न्यायालयीन दावे निकाली लागल्यावर तसेच भूसंपादन झाल्यानंतर रस्ता एक वर्षात करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले आहे.

रस्त्यासाठी आवश्यक जागा पीएमआरडीए एफएसआय/टीडीआर च्या माध्यमातून उपलब्ध करून देऊन पीएमसी रस्ता करणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांची तत्परता..

टीम वाकोचे उपोषणकर्ते अनिलकुमार मिश्रा यांचे चौथ्या दिवशी आंदोलन सुरु असल्याने विविध पक्षांचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विचारपूस केली. पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रामभाऊ दाभाडे यांनी देखील मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा सुरू केला होता.शिवसेनेच्या महिला पदाधिकारी डॉ. सारिका पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याशी मिश्रा यांचा फोनद्वारे संपर्क संवाद घडवून आणला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याबाबत मार्ग काढणार असल्याचे कळविले. पीएमसी, पीएमआरडीए अधिकारी यांच्याशी चर्चा करून याबाबत लवकर कार्यवाही करणार असल्याचे आश्वासित केले. त्याचबरोबर राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे प्रशांत जगताप यांनी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना फोन लावून लेखी उत्तर देण्याबाबत कळविले. विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते उपोषणाला पाठींबा दिला होता.

# चिंबळी परिसरात नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी; दुर्गा मूर्तींच्या किमतीत १५ टक्के वाढ

**चिंबळी | प्रतिनिधी**

**नुकताच गणेशोत्सव थाटामाटात साजरा झाल्यानंतर आता खेड तालुक्यातील कुरूळी, चिंबळी, मोई आणि केळगाव परिसरात नवरात्रोत्सवाची जोरदार तयारी सुरू आहे. येत्या सोमवारी (दि. २१) पारंपरिक पद्धतीने घरोघरी आणि मंदिरांमध्ये घटस्थापना केली जाणार असून, मंडळांच्या वतीने दुर्गा मातेच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होणार आहे.**



कुरूळी येथील कुंभारवाड्यातील प्रसिद्ध मूर्तिकार कैलास माळशिकर यांनी दोन फूट ते पाच फूट उंचीच्या आकर्षक दुर्गा मूर्ती तयार केल्या आहेत. या मूर्तींच्या रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात आहे. मात्र, मूर्ती बनवण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे यंदा मूर्तींच्या दरात १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे एका मूर्तीची किंमत दोन हजार ते पंधरा हजार रुपये इतकी ठेवण्यात आली आहे.

स्थानिक तरुण मंडळे आणि ग्रामस्थ उत्साहाने नवरात्रोत्सवाच्या तयारीला लागले असून, परिसरात उत्साहाचे वातावरण आहे. मूर्तिकार कैलास माळशिकर यांनी सांगितले, की यंदा मूर्तींची मागणी वाढली असून, प्रत्येक मूर्ती पारंपरिक आणि आधुनिक कलेचा संगम साधणारी आहे. नवरात्रोत्सवात या मूर्तींच्या प्राणप्रतिष्ठेने परिसरातील धार्मिक वातावरण अधिकच खुलणार आहे.